07 TO 13 NOVEMBER 2022 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 11/5/2022 9:22 PM Page 1


|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० | अंक : ४६ | सोमवार दि. ०७ नोव्हेंबर २०२२ ते रविवार दि. १३ नोव्हेंबर २०२२ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## तरुण विवाहितेला पाहुन ८० वर्षाचा म्हातारा पेटला
## 'गोडाऊनमध्ये तिला पाठव' म्हणताच पतीने जीव घेतला

नवी मुंबई/एस.कुमार

स्त्री देहाचे आकर्षण प्रत्येक पुरुषाला असते आणि त्याला वयाची मर्यादाही लागत नाही. आजकाल तर १६-१७ वर्षांच्या मुलांपासून ७०-८० वर्षांच्या म्हाताऱ्यांपर्यंत सर्वांनाच लैंगिक सुखाचे वेड लागलेले आहे. त्यामुळेच समाजात व्यभिचार बोकाळलेला आहे. मात्र तो थांबवण्यासाठी सरकारकडून कोणतेही प्रयत्न केले जात नसल्याने जे वासनांध आहेत ते सतत शिकार शोधात असतात. कधी कधी तर असे नराधम नात्याचा आणि वयाचा सुद्धा विचार करीत नाही. त्यांच्यासाठी स्त्री हि फक्त भोगदासी असते आणि अशा विकृत मनोवृत्तीच्या लोकांना फक्त आपली वासना शमवायची असते, त्यासाठी त्यांची कुठल्याही थरालाजायची तयारी असत आणि पुरुषाच्या याच विकृत मानसिकतेमधून बलात्काराच्या आणि विनयभंगाच्या घटना घडतात. त्यामुळे महाराष्ट्र सारख्या पुरोगामी आणि सुसंस्कृत राज्यातही महिला सुरक्षित नाहीत. दिशा सारखा बलात्कार विरोधी कायदा सरकारने केला आहे. तरी सुद्धा बलात्काराच्या आणि विनयभंगाच्या घटना घडत आहेत आणि याला कारणीभूत आहे. लैंगिक विकृती चालवणारे साहित्य जे सहज आपल्या मोबाईलवर सुद्धा उपलब्ध होते. प्रत्येक मोबाईलमध्ये इंटरनेट असल्याने आणि या इंटरनेटवर हजारो पोर्न साईड उपलब्ध असल्याने स्त्री पुरुषांच्या लैंगिक संबंधाच्या क्लिप्स बघण्याचा घाणेरडा नाद लोकांना लागला आहे आणि या नादामुळे केवळ तरुणच नव्हे तर म्हातारे लोक सुद्धा बिघडू लागलेत. नवी मुंबईतील सेक्टर १९ मध्ये किराणा मालाचे दुकान चालवणाऱ्या मोहन चौधरी याच्या पत्नीवर रॉकेल एजन्सी चालवणाऱ्या ८० वर्षांच्या शामाकांत नाईकची वाईट नजर होती. एकदा तो मोहनला म्हणाला तुझी बायको खूप सुंदर आहे, पण मोहनने त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. पण त्यानंतर शामकांतची हिम्मत वाढली आणि त्याने एकदा त्याला म्हटले तुझ्या बायकोला माझ्या गोडावूनमध्ये पाठवून दे! म्हाताऱ्या शामकांतचे हे बोलणे ऐकूण मोहन चिडला आणि त्याने शामकांत याची गळा दाबून हत्या केली आणि मृतदेह अज्ञातस्थळी नेऊन टाकला. मात्र पोलिसांनी मोठ्या शिताफीने तपास करून आरोपी मोहनला अटक केली.





वपोनि रवींद्र पाटील




आरोपी मोहन चौधरी

२९ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर रोजी दिड वाजताच्या पूर्वी डिसुझा होम बिल्डींग शॉप नं.२ प्लॅट न. ३५ सेक्टर नंबर १९ उलवे प्लॅट नंबर २६३ च्या पाठीमागे निर्जस्थळी पाण्याच्या डब्यक्यात एका ७० ते ८० वर्ष वयाच्या इसमाचा मृतदेह पडलेला असल्याची माहिती एनआरआय सागरी पोलीस स्टेशनला मिळाली. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील, पो .ना देवरे, फंड, तांडेल, कवठे, पाटील, सोनवणे, वाघ, कदम इत्यादी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळी पडलेल्या मृतदेहाची पाहणी केली असता, मृतदेह कुजलेला होता. पोलिसांनी मृतदेहाचा पंचनामा करून प्रेत वाशी येथील एम.जी. एम रुग्णालयात शवविच्छेदनासाठी रवाना केला. सदर इसम कोण कुठला? या बाबत काही माहिती नव्हती. पोलिसांनी आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीतून कोणी बेपत्ता आहे का? याचा शोध घेतला असता, शामकांत नाईक हा ८० वर्षाचा इसम बेपत्ता असल्याची माहिती त्याचा मुलगा शेखर नाईक याने सागरी पोलीस ठाण्यात दिली होती, मिसिंगची नोंद करून पोलिसांनी शोध सुरू केला. दरम्यान घटनास्थळी जो मुतदेह सापडला होता, तो मृतदेह आणि मिसिंग व्यक्तीचे वर्णन जवजवळ सारखे होते. त्यामुळे पोलिसांनी शामकांत नाईक यांचा मुलगा व नातेवाईक यांना पोलीस ठाण्यात बोलावून ही सर्व माहिती दिली. पोलीस पथक त्यांना घेऊन एम जी एम रुग्णालयात घेऊन गेले .त्यांना तो मृतदेह दाखवला. तो बघून नाईक कुटूंबियांना धक्का बसला. तो मृतदेह बघून हा माझे वडील शामकांत नाईक यांचा असल्याचे सांगितले. पोलिसांनी सर्व सोपस्कार पार करून तो मृतदेह पुढील अंत्यसंस्कारासाठी कुटुंबियांच्या ताब्यात दिला. मयताची ओळख पटली होती. पण खून कोणी केला याचा उलगडा झाला नव्हता. पोलिसांनी तपास पथक स्थापन करून या खुनाचा छडा लावण्याचा चंग बांधला. शामकांत नाईक हे शेवट मिसिंग झालेले ठिकाण सेक्टर १९ नवी मुंबई उलवे येथील सीसीटिव्ह मध्ये दिसुन येत होते. तपास पथकाने शामकांत नाईक यांचा मृतदेह ... पान २ वर

## पत्नीने षंढ म्हणताच पती चिडला रानात त्याने तिचा मुडदा पाडला

धुळे/क्राईम रिपोर्टर



आरोपी राजेंद्र

लग्नानंतर संसाराच्या वेलीवर फूल उमलले नाही, तर समाजात लोक नावे ठेवतात. खास करून महिलेला वांझोटी म्हणून हिणवले जाते. त्यामुळे पती-पत्नीमध्ये वाद सुरु होतो. वास्तविक अशा समस्येवर वैद्यकीय उपचाराने तोडगा निघू शकतो, पण ग्रामीण भागात अपत्य प्राप्तीसाठी डॉक्टरी उपचार करण्याऐवजी देवदेवस्की केली जाते. धुळे जिल्ह्यातील पेरेजपूर येथील राजेंद्र आणि मीनाबाई यांच्या लग्नाला २१ वर्ष होऊनही त्यांना मूल होत नव्हते. त्यामुळे दोघांमध्ये वाद सुरु होता. एकेदिवशी रानात दोघे लाकडे तोडायला गेले असता पत्नीने रागाच्या भरात पतीला षंढ म्हटले. त्यामुळे पती चिडला आणि त्याने तिथेच पत्नीची कुऱ्हाडीचे घाव घालून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी पतीला अटक केली आहे.

धुळे जिल्ह्याच्या साक्री तालुक्यातील अष्टाणे गावातील मीनाबाईचे साक्री तालुक्यातील पेरेजपूर येथील राजेंद्र शिवा सोनावणे या तरुणाशी सुमारे विस वर्षापूर्वी लग्न झाले होते. लग्न झाले तेव्हा मीनाबाई तिच्या आई-वडीलांसह सुखात होती. सरला आणि केवलबाई नावाच्या दोन बहीणी आणि सजन व नाना नावाचे दोन भाऊ मीनाबाईला होते. सासरी नांदायला आली तेव्हा तिचे आई-वडील सर्वार्थाने समाधानी आणि सुखी होते. मोलमजुरी करुन गुजराण करत होते, पण कुठल्याच गोष्टीची ददात नव्हती. दुर्दैवाने विवाहानंतर मीनाबाई आपल्या आई-वडीलांना पारखी झाली होती. भाऊ आणि बहीणीसोबत अधून-मधून ती रहात असायची. बहीणी आणि भाऊ तिच्याकडे अधून-मधून यायचे. ती पण त्यांच्याकडे जात असायची. मीनाबाई माहेरी खऱ्या अर्थाने सुखी-समाधानी होती. सासरी मात्र तिला विविध समस्यांना तोंड द्यावे लागत होते. मुळात सासरची आर्थिक स्थिती खूपच हलाखीची असल्याने मीनाबाई आपल्या नवऱ्याबरोबर गावाबाहेरच्या जंगलात जायची. सुकलेली झाडे तोडून त्याची मोळी बांधून ती विकून त्यावर त्यांचा दिवसाचा उदरनिर्वाह करायचे. थोडक्यात सांगायचे म्हणजे मोळ्या विकून मीनाबाई व तिचा नवरा राजेंद्र सोनावणे हे घरसंसार चालवत होते. मीनाबाई वीस वर्षाची असतांना तिचे राजेंद्रबरोबर लग्न झाले होते. आदिवासी समाजात मुलगी तारुण्यात येताच तिचं लग्न केले जाते. मीनाबाईसुद्धा त्याला अपवाद नव्हती. मीनाबाईच लग्न होवून २१ वर्षे झाली होती. पण दुर्दैवाने लग्नाला २१ वर्षे होवूनसुद्धा ती अपत्यापासून वंचित होती. राजेंद्र सोनावणे याचे आई-वडील जिवंत असताना त्यांनी राजेंद्रला अपत्य व्हावे म्हणून अनेक नवस केले, अनेक कोंबड्याचा बळी दिला. मीनाबाईनेसुद्धा तसेच केले, तिनेही ... पान २ वर



## मित्राची पत्नी देत नव्हती भाव म्हणून मित्रावरच घातला घाव

बेळगावी (खानापूर)/क्राईम रिपोर्टर



मयत मारुती

काही पुरुष इतके स्त्रीलंपट असतात कि एखाद्या महिलेने त्यांना भाव दिला नाही तरी ते तिच्या मागे लागतात. तिच्यावर जाळे टाकण्याचा प्रयत्न करतात. खानापूर मधील प्रशांतची त्याच्या मित्राच्याच बायकोवर वाईट नजर होती. पण ती त्याला भाव देत नव्हती हि गोष्ट तिच्या पतीला समजताच त्याने प्रशांत बरोबरची मैत्री तोडून त्याला चारचौघांत चांगली समज दिली. तसेच त्याच्या विरोधात पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. त्यामुळे प्रशांत चिडला आणि त्याने मित्राची निर्घुणपणे हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी प्रशांतला अटक केली आहे.



आरोपी प्रशांत

खानापूर शहरातील बाहेर गल्लीतील आश्रय कॉलनीत मारूती उर्फ कृष्णा गणुराव जाधव हे आपल्या पत्नी मुलासह राहयला आहेत. त्याच्या गल्लीत जवळच प्रशांत दत्तात्रय नार्वेकर हे राहयला आहेत. मारूती याची बायको रूपाली (काल्पनिक नांव) ही दिसायला देखणी आणि सुंदर असून तशी ती बोलक्या स्वाभावाची आहे. कोणाच्या ही नजरेत भरणारी तिची जवानी असल्याने बघणारा नेहमी तिच्याकडेच एकटक बघत असतो. तशी ती बघणाऱ्याला चालू वाटत असल्याने तिच्याशी बोलण्याचा जवळीक साधण्याचा अनेकजण प्रयत्न करीत असतात. प्रशांतला देखील तसेच वाटत होते. तो रूपालीच्या जास्ती जास्त जवळ जाण्याचा प्रयत्न करीत होता. वाटेत ती कधी तरी भेटली तर काय वहिनी म्हणून तो तिला बोलवित होता. तो गल्लीतील असल्याने सुरूवातीला रूपाली ही तो बोलविला की थांबत होती. त्याच्याशी मनमोकळे पणाने बोलत होती. याचा नेमका अर्थ त्याने काढला होता. त्याला वाटत होते की रूपाली त्याला लाईन देत आहे. त्यामुळे त्याच्या मनात तिच्या विषयी प्रेम निर्माण झाले. त्याला ती आवडू लागल्याने त्याच्या मनात वेगळेच वातावरण निर्माण झाले होते. कधी एकदा हिला आपल्या अंगाखाली घेऊन कुस्करतो असे त्याला ... पान २ वर

## चंचल पत्नीने नातेवाईकालाच पटवले अखेर पतीला आपल्या मार्गातून हटवले



औसा/शिवाजी मोरे

एखाद्या बाईचा नवरा साधा भोला असला आणि पत्नी चंचल असली कि मग ती पतीच्या साधेपणाचा गैरफायदा घेते आणि दुसऱ्याशी सूत जुळवते. लामजना येथील कुमार बळूसरे हा साधा तरुण होता, पण त्याच्या याच साधेपणाचा गैरफायदा घेत त्याच्या पत्नीने नात्यातल्याच एकाशी अनैतिक संबंध जुळवले, पण पतीचा अडथला येत असल्याने तिने प्रियकराच्या मदतीने पतीचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.





२ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी औसा तालुक्यातील तपसेचिंचोली ते गाडवेवाडी जाणाऱ्या रस्त्यावर एका शेताच्या बाजूला अंदाजे ३० ते ३५ वर्षीय इसमाचा मृतदेह आढळून आला. सकाळी सकाळी जनावरांचे दूध काढण्यासाठी शेताकडे जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या लक्षात ही गोष्ट लक्षात आली. त्यांनी तात्काळ किल्लारी पोलीस ठाण्याला संपर्क करून संबंधित घटनेची माहिती दिली. किल्लारी पोलीस ठाण्याचे ठाणे अंमलदार यांनी घटनेची प्राथमिक माहिती घेतली. संबंधित घटनेची माहिती लामजना गावाचे बीट अंमलदार सचिन ऊसतुर्गे यांना दिली. बीट अंमलदार सचिन ऊसतुर्गे यांनी घटनेचे गांभीर्य ... पान २ वर

## उसन्या पैशावरून वाद झाला मित्रांनीच रेहमानचा खून केला

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर



मयत रेहमान

मैत्रीत माणसाने कधीही पैशाचे व्यवहार करू नये आणि उसनवारी केली तरी वेळेवर असे व्यवहार मिटवावेत. खास करून मित्र जर गुन्हेगारी प्रवृत्तीचे असतील तर अशा लोकांकडून पैसे घेऊ नये आणि घेतले तर वेळेवर परत करावेत. मात्र इचलकरंजीमध्ये राहणाऱ्या रेहमानला हेच कळले नाही. प्रथम तो गुन्हेगारी टोळीत सामील झाला आणि टोळीतील एकाकडून त्याने पैसे घेतले, पण वेळेवर ते परत करू शकला नाही. त्यामुळे ज्याने त्याला उसने पैसे दिले होते त्यानेच मित्रांच्या मदतीने रेहमानचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.



इचलकरंची शहरातील शहापूर विठ्ठलनगर परिसरात रहेमान नदाफ हा आपल्या आई वडिलासह राहयला आहे. त्याचे आई-वडिल गेल्या काही वर्षापूर्वी कर्नाटकातून इचलकरंजीत मोलमजुरीसाठी आले. रहेमान याचे वडिल शहापूर येथे एका यंत्रमाग कारखान्यात कामाला होते.त्याची घरची परिस्थीती ही तशी बेताचीच होती. रहेमान हा मोठा झाला असल्याने त्याच्या आई वडिलांनी त्याला काम करण्याचा तगादा लावला होता. पण तो वाईट मित्रांच्या संगतीला लागून बिघहत चालला होता. शहरातील डेक्कन, जवाहरनगर भागात बाबर गॅंग, जर्मन गॅंगचे वर्चस्व आहे. या गॅंगमधील यश गागडे, आसिफ चिक्कोडे, आणि साहिल माछरे ... पान ६ वर

## वंशाच्या दिव्याने वाटोळे केले पार दारुड्या मुलाला बापानेच केले ठार

पुणे/क्राईम रिपोर्टर

कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ अशी एक म्हण आहे आणि ती खरीच आहे. कारण आई-वडील आपल्या मुलाला मोठ्या कष्टाने लहानाचा मोठा करतात. कारण म्हातारपणी तो आपला आधार बनवा पण काही मुले व्यसनी बनून आई-वडिलांनाच त्रास देत असतात. अशाच एका दारुड्या मुलाची त्याच्या बापानेच कुऱ्हाडीचा घाव घालून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी बापाला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वडील आणि मुलात घरात काही कारणास्तव वाद झाला. वडील बाळू हे गावात शेती आणि पशुपालन करतात. त्यांच्या मुलगा समीर कोणताही कामधंदा करत नाही. शिवाय समीर दारुच्या आहारी देखील गेला होता. दारुच्या व्यसनामुळे समीरचं लग्न जुळत नव्हतं. या कारणावरुन घरात कायम वाद निर्माण व्हायचे. बाळू यांची थोरली सून मंगळवारी दुपारी तीनच्या सुमारास घरात स्वयंपाक करत होती. त्या वेळी समीर हॉलमध्ये झोपला होता. बाळू अचानक घरी आले. त्यांनी कुऱ्हाडीने समीरच्या डोक्यात मारून त्याची हत्या केली. समीरच्या भावजयीने हॉलमध्ये जाऊन पाहिलं असता समीर हॉलमध्ये रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. मुलगा व्यसनी होता. त्यामुळे मुलाचं आणि वडिलांची घरात रोज भांडणं ... पान ६ वर

## 'हनी ट्रॅप'चे जाळे डॉक्टरला नाही दिसले पोलिसांच्या कारवाईत ब्लॅकमेलर फसले

जळगाव/क्राईम रिपोर्टर



हनी ट्रॅप हा ब्लॅकमेलींगचाच एक भाग आहे. यात स्त्री लंपट माणसाला एखाद्या सुंदर महिलेच्या मार्फत जाळ्यात अडकवले जाते आणि नंतर त्या दोघांच्या लैंगिक संबंधाचे चित्रीकरण करून त्या माणसाला जाळ्यात अडकवले जाते. जळगावमध्ये अशाच एका डॉक्टरला हनी ट्रॅप अडकवून एका टोळीने त्याच्याकडे ४ लाख रुपयांची मागणी केली होती. मात्र त्या डॉक्टरने पोलिसांकडे धाव घेताच पोलिसांनी सापळा रचून सर्व आरोपींना अटक केली.

मोह हे दुखा:चे कारण असते असे म्हटले जाते. मोह हा विविध प्रकारचा असतो. बाई, बाटली, पैसा आणि सत्ता या चार प्रकारचा मोह अनेकांना भुरळ घालणारा ठरतो. या चार मोहांपैकी बाईचा नाद सर्वाधिक त्रासदायक आणि वेदनादायी असतो. बाईचा नाद घाली दुखा:ला साद असे म्हटले जाते. स्त्रीलंपटपणा ही अनेकांची कमजोरी असते. ही कमजोरी असलेली व्यक्ती हेरुन त्याला आपल्या जाळ्यात अडकवून त्याच्याकडून आर्थिक लाभ पदरात पाडणारी टोळी विविध शहरात कार्यरत असते. अशा व्यक्तीवर निशाना साधण्यासाठी एखाद्या अप्सरेसमान तरुणीची मदत घेतली जाते. त्या तरुणीला पुढे करुन स्त्रीलंपट व्यक्तीची चाचपणी केली जाते. त्यानंतर त्या व्यक्तीला तरुणीकडून शरीरसुखाची ऑफर दिली जाते. या सर्व घडामोडी दरम्यान पडद्याच्या आड बदमाशांची एक टोळी कार्यरत असते. अशाच एका टोळीच्या कचाट्यात जळगावचा एक डॉक्टर अडकला.

जळगाव शहरातील रामानंद नगर परिसरात हा डॉक्टर राहतो. पती पत्नी दोघेही व्यवसायाने डॉक्टर आहेत. जळगावच्या मध्यवर्ती ठिकाणी न्यायालय परिसरात या डॉक्टरचा दवाखाना आहे. समव्यावसायीक डॉक्टर पत्नी असलेल्या या डॉक्टरची कमजोरी एका महिलेच्या लक्षात आली होती. स्त्री अर्थात ललना ही त्या डॉक्टरची कमजोरी असल्याचे त्या महिलेने हेरली ... पान ६ वर

07 TO 13 NOVEMBER 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 11/5/2022 9:23 PM Page 1



पान १ वरून....

## तरुण विवाहितेला पाहुन ८० वर्षांचा...

मिळून आलेल्या ठिकाणी डिसुझा होम प्लॉट नं. ३५ या मार्गवरील सीसीटिव्ही पाहणी केली असता, दुकानाचा मालक मोहन उर्फ मोहनलाल गणाराम चौधरी (वय २७) हा सीसीटीव्ही कॅमेरे कैद झाला. त्याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. सुरुवातिला तो असता उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला.नंतर विश्वासात घेतल्यानंतर त्याच्याकडे केलेल्या कौशल्यपूर्ण तपासामध्ये त्याने गुन्ह्याची कबुली दिली. मोहन उर्फ मोहनलाल गणाराम चौधरी (वय २७) हा मूळचा राजस्थानचा चार वर्षापूर्वी तो नवी मुंबईत सिद्धिविनायक होम सेक्टर १९, उलवे या ठिकाणी किराणा मालाचे दुकान चालवत होता. त्याच परिसरात शामकांत नाईक हे रॅकेलची होलसेल विक्री करत असत. त्यांच्या कडून मोहन रॅकेल घेत असत. मागील ४ वर्षे पासून ते दोघे एकमेकांना ओळखत होते. शामकांत नाईक यांना मस्करी करण्याची सवय होती. एके दिवशी मोहनची पत्नी दुकात आली असता, शामकांत नाईक यांनी तिला पाहिले आणि त्यांनी मोहन यास तुझी पत्नी खूप सूंदर आहे, असे म्हटले. शामकांत नाईक यांना मस्करी करण्याची सवय असल्याने मोहन याने ते प्रकरण फारसे गांभीर्याने घेतले नाही. कालांतराने शामकांत नाईक यांनी मोहन यांच्या पत्नी बदल अपशब्द उचरल्याने त्याला राग आला. तू तुझ्या पत्नीला माझ्या गोडाऊन मध्ये पाठवून दे, असे म्हटल्याने मोहनला राग आला. या रागाच्या भरात मोहनने आपल्या किराणा दुकानात शामकांत नाईक याला बोलावून त्याला मारहाण केली. त्यानंतर नॉयलांन दोरीने गळा आवळून त्याची हत्या केली. नंतर तो मृतदेह गाडीवरून नेऊन डिसुझा होम बिल्डींग शॉप न .२ प्लॅट न. ३५ सेक्टर नंबर १९ उलवे प्लॅट नंबर २६३ च्या पाठीमागे निर्जस्थळी पाण्याच्या डब्यक्यात फेकून दिला. इकडे वडील शामकांत नाईक हे घरी न आल्याने मुलाने पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद केली. तपासत मोहन चौधरी याने शामकांत नाईक या ८० वर्षीय वयाच्या इसमाची हत्या केल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी एनआरआय पोलीस ठाण्यात कलम ३०२, २०१ अन्वये दाखल गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास वपोनी रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे हे करीत आहेत.

## पत्नीने षंढ म्हणताच पती चिडला...

अपत्यप्राप्तीसाठी बुवाबाजी केली. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने अत्याधुनिक स्वरुपाचे औषध उपचार मात्र तिला घेता आले नाहीत, पण पारंपारीक पद्धतीने सर्व उपाय केले गेले होते. आई-वडील गेल्यानंतरही इतर नातेवाईकांच्या सांगण्यानुसार राजेंद्र आणि मीनाबाईने आदिवासी समाजातील परंपरेनुसार सर्व प्रकारचे उपाय केले, पण उपयोग झाला नव्हता. त्यामुळे या दोघांनी अपत्याची आशा सोडून दिली होती. राजेंद्र आणि मीनाबाई दिवसभर काबाडकष्ट करायचे. रात्री एकत्र जेवण करून झोपायचे. अशा प्रकारच्या दिनक्रमाला कारणपरत्वे दोघांमध्ये खटके उडायचे, भांडणं व्हायची. अशावेळी त्यांचे नातेवाईक त्यांच्यामधील वाद मिटवत असत. राजेंद्र आणि मीना एकत्र रहात होते, पण आपल्याला अपत्य नसल्याचे शल्य त्यांना बोचत होते, त्यासाठी ते दोघेही एकमेकांना दोष द्यायचे. नेमका दोष कुणात आहे हे दोघांनाही माहित नव्हते, पण भांडण मात्र एकमेकांचे दोष दाखवण्यामुळेच होत असायचे. अनेक वेळा राजेंद्र आणि मीनाबाईमध्ये झालेली भांडणे मिटवण्यासाठी मीनाबाईचा मामेभाऊ बंडू शंकर निकम हा पुढाकार घेत असायचा. बंडू निकम हा साक्री तालुक्यातील अष्टाणे गावात रहायचा. त्याची घरची परिस्थिती खूप काही बरी नव्हती, पण समाधानी जीवन जगता येईल येथपर्यंत ठीक होती. साठ वर्षे वयाचा बंडू हा रत्नाबाई नावाच्या आपल्या पत्नीसोबत रहातो. त्यांच्यासोबत त्यांचा मोठा मुलगा दत्तू आणि सून मीना अष्टाण्यालाच रहातात. खंडूचा लहान मुलगा पिंटू व सून पूनम हे दोघे साक्री तालुक्यातीलच शेणपूर गावात रहातात. बंडु निकम याचे राजेंद्र सोनावणे आणि त्याची बायको मीनाबाई यांच्याशी आत्मीयतेचे संबंध होते. कर्ता पुरुष म्हणून बंडू अधून-मधून राजेंद्र व मीना यांना भेटायला यायचा व प्रसंगी दोघांमध्ये उद्भवलेले भांडणसुद्धा मिटवायचा. काही वेळा बंडू निकम, राजेंद्र आणि मीनामधील भांडणे मिटवण्यासाठी आपल्या मुलांना आणि सुनांनाही पाठवायचा.

दि. २५ सप्टेंबर २०२२ रोजी राजेंद्र व त्याची बायको मीनाबाई नेहमीप्रमाणे सकाळी लाकडे तोडून मोळी बांधून आणण्यासाठी पेरेजपूर गावाबाहेर गेले होते. राजेंद्र आणि मीनाबाईला सकाळी गावाबाहेर जातांना सर्व गावाने पाहिले होते, मात्र दुपारी साडेतीन वाजण्याच्या दरम्यान राजेंद्र हा एका हातात रक्ताळलेली कुऱ्हाड आणि दुसऱ्या हातात रक्ताळलेला कोयता घेवून गावाबाहेरून गावात येवून घराकडे निघाला होता. राजेंद्र हातात कुऱ्हाड व रक्ताळलेला कोयता घेवून घराकडे जातांना 'मनीबाई तठे पडेल शे 'मनीबाई तठे पडेल शे' असे बडबडत होता. पेरेजपूर गावातील किरण मोरे आणि त्याच्या साथीदारांनी राजेंद्रचा तो अवतार पाहिला आणि त्यांना त्याच्या या अशा वागण्यामागे काही काळेबेरे असल्याचा संशय आला व या संशयापोटी किरण मोरेने पेरेजपूर गावाचे पोलीस पाटील मिलिंद मोरे यांना फोन करून कळवले. किरण मोरेचे बोलणं ऐकताच पोलीस पाटील मिलिंद मोरे यांनी घटनास्थळी म्हणजे राजेंद्र सोनावणे याच्या घरी धाव घेतली. पोलीस पाटील मिलिंद मोरे हे विमनस्क स्थितीतील राजेंद्रला भेटले असता 'मनीबाई तठे पडेल शे' असंच बडबडत होता. राजेंद्र हा बोलण्याच्या मनस्थितीत नसल्याने पोलीस पाटील मिलिंद मोरे यांनी घटनास्थळी म्हणजे राजेंद्र सोनावणे याने सांगितलेल्या स्थळी धाव घेतली. दरम्यान मीनाबाईचा मृतदेह पेरेजपूर गावातील वामन मोरे याच्या पडीत शेतात पडला असल्याची माहिती मिलिंद मोरे यांना मिळाली. त्यामुळे मिलिंद मोरे हे वामन मोरे यांच्या शेतात गेले. तेथे मीनाबाईचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मिलिंद मोरे यांना दिसला. मीनाबाईचा मृतदेह स्वतः पहाताच पोलीस पाटील या नात्याने मिलिंद मोरे यांनी साक्री तालुका पोलीस स्टेशनला फोन करून मीनाबाईचा निर्घृण खून झाल्याची माहिती दिली. मीनाबाईच्या खुनाची माहिती मिळताच साक्री पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अजयकुमार चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप मैराळे यांनी आपल्या फौजफाट्यासह घटनास्थळास भेट दिली असता मीनाबाईच्या सर्वांगावर गंभीर जखमा 'दिसून आल्या व मीनाबाई रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे आढळले. पोलीस निरीक्षक अजयकुमार चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक भानुदास नऱ्हे यांनी घटनास्थळाचा आणि मीनाबाईच्या मृतदेहाचा पंचनामा करून, मीनाबाईचा मृतदेह पोस्टमार्टमसाठी शासकीय रुग्णालयात पाठवला. दरम्यान पेरेजपूर गावातील लोकांनी अष्टाणे गावातील मीनाबाईचा मामेभाऊ बंडू शंकर निकम याला फोन करून घडलेल्या घटनेची माहिती दिली. मीनाबाईच्या मृत्यूची बातमी कळताच बंडू निकम याने शासकीय रुग्णालयात धाव घेतली. मीनाबाईच्या मृतदेहाची पाहणी केल्यानंतर परिस्थितीजन्य पुराव्याचा हवाला देत बंडू निकम याने साक्री पोलीस स्टेशनला राजेंद्र सोनावणे याच्यावर मीनाबाईच्या हत्येचा संशय घेत त्याच्याविरोधात फिर्याद दिली. साक्री पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अजयकुमार चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक भानुदास नऱ्हे यांनी चौकशीसाठी मीनाबाईचा नवरा राजेंद्र सोनावणे याला ताब्यात घेतले. चौकशी दरम्यान प्रारंभी राजेंद्रने पोलिसांना बुचकळ्यात टाकण्याचा प्रयत्न केला. पण प्रश्नाच्या सरबत्तीनंतर राजेंद्र बोलता झाला. वीस वर्षापूर्वी राजेंद्रचा मीनाबाईसोबत विवाह झाला होता. मात्र सर्व प्रकारचे उपचार करुनही राजेंद्र आणि मीनाबाईला अपत्यप्राप्ती झाली नव्हती. त्यामुळे त्यांना नातेवाईकांचे टोमणे खावे लागायचे. त्याच कारणास्तव त्यांच्यात वेळोवेळी भांडणे होत असायची.त्यादिवशी म्हणजे रविवार दि. २५ सप्टेंबर २०२२ रोजी नित्यनियमाप्रमाणे राजेंद्र सोनावणे आणि मीनाबाई लाकडे तोडून मोळी आणण्यासाठी गेले असतांना अपत्यहिनतेवरुनच दोघांमध्ये वाद उद्भवला. राजेंद्र तिला निपुत्रीक म्हणून हिणवू लागला. या वादामध्ये मीनाबाईचाही संयम ढळला. तिने राजेंद्रला षंढ म्हणून संबोधले. त्याचा राजेंद्रला राग आला. त्याच्या तळपायाची आग मस्तकात भिडली. आपली बायको आपल्याला नपुंसक म्हणते यावरुन त्याचा संताप अनावर झाला. त्या संतापात राजेंद्रने मीनाबाईवर हातातील कोयत्याने व कुऱ्हाडीने प्राणघातक हल्ला केला आणि त्यातच बेसावध मीनाबाई गतप्राण झाली. संतापामध्ये आपल्या हातून बायकोचा खून झाला याचा राजेंद्रला पश्चाताप होवू लागला. पण वेळ निघून गेली होती. काय करावे हे त्याला सुचत नव्हते. विमनस्क मनस्थितीत राजेंद्र बायकोला मृतावस्थेत घटनास्थळीच सोडून बडबडत घरी आला आणि घटनेची उकल झाली. कारण काहीही असले तरी राजेंद्र सोनावणे यानेच आपल्या बायकोचा बळी घेतला हे निष्पन्न झाल्याने जिल्हा पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील व पोलीस निरीक्षक अजयकुमार चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी भानुदास नऱ्हे यांनी राजेंद्र सोनावणेला गजाआड केले. त्याच्याविरोधात भा.दं.वि. ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल केला. पुढील तपास सुरु आहे.

## मित्राची पत्नी देत नव्हती भाव...

झाले. त्यामुळे तो तिच्याकडे त्या नजरेने पाहून तिला कामुक इशारे करीत होता. त्याच्या मनातील रूपालीने ओळखले असल्याने अलिकडे ती त्याच्याशी बोलत नव्हती, किंवा त्याला जास्त भाव ही देत नव्हती. तो मात्र मुद्दामच तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करीत होता. ती कुठे ही बाहेर गेली की तो तिचा पाठलाग ही करीत होता. पाठलाग करीत असताना तो मुद्दामच तिच्याकडे बघून कामुक इशारे करीत होता. त्याच्या या त्रासाला छेडछाडीला ती कंटाळली होती. तिला काय करावे काय नको असे झाले होते. तिला ही संसार होता. नवरा बेळगाव बाहेर कामाला असल्याने तो सकाळी कामावर गेला की रात्री उशिराच परत येत होता. तिचा नवरा आणि प्रशांतची मैत्री होती. परंतु ही मैत्री घरच्या बाहेर होती. त्याला माहित नव्हते की प्रशांतच्या मागे लागला आहे. तो तिची छेडछाड करीत असतो तिच्याकडे बघून कामुक हालचाल करीत असतो हे त्याला माहित नव्हते. वाटेत कधी काय भेटले की हाय हॅलो पुरती त्याची ओळख मैत्री होती. गेल्या काही महिन्यापूर्वीच मारूतीला प्रशांत हा आपल्या बायकोची छेडछाड काढत असल्याचे समजले होते. त्यामुळे तो त्याच्यापासून लांबच राहत होता. तो बोलला किंवा भेटला तरी तो त्याला टाळत होता. एकाच गल्लीत राहत असल्याने कुठे भांडणे नकोत, किंवा कुणाशी वैर नको या भावनेने मारूती राहत होता.याचा वेगळाच अर्थ प्रशांतने काढला होता. त्याला वाटत होते की मारूती आपल्याला घाबरत आहे. त्याचेत आपल्याला विचारण्याचे धाडस नाही म्हणून तो गप्प बसला आहे. एव्हाना प्रशांत हा मारूतीच्या बायकोच्या मागे लागला असल्याचे आश्रय गल्लीतील अनेकांना माहित होते. तर याच्या ही पलिकडे मारूतीची बायको आपल्याला लाईन देत आहे ती आपल्याला लागली आहे असे प्रशांतने आपल्या जवळच्या मित्रांना सांगून तिची बदनामी केली होती. आपल्या बायकोची बदनामी प्रशांत हा करीत आहे याची कुणकुण मारूतीला लागलेली होती. तो त्याचेवर चिडून होता.याचा जाब प्रशांतला विचारायचा असे मारूतीने ठरविले होते. गेल्या वर्षभरापासून प्रशांत त्याच्या बायकोच्या मागे लागला होता. यातून त्याची दोन तीन वेळा भांडणे ही झाली होती. त्या अगोदर रूपालीने ही प्रशांतला चप्पलेचा प्रसाद दिला होता. त्यामुळे प्रशांतला ही काही ही करून तिला आपल्या अंगाखाली घेवून कुस्करायचेच असे त्याने ठरविले होते. कुणाकडून तरी त्याने तिचा मोबाईल नंबर मिळविलेला होता. तिच्या व्हॉटसअॅपवर ही त्याने अश्लिल मेसेज टाकला होता. त्यामुळे रूपालीने त्याचा नंबर ब्लॉक करून टाकला होता. त्याच्या या त्रासाला नवरा बायको दोघे ही कंटाळलेले होते. आपण गप्प राहिलो तरी तो जास्त करतो म्हणून मारूतीने अगोदर आपल्या मित्रांना घेऊन त्यालासमज देण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यावेळी ही उलट प्रशांतने तुझी बायकोच मला लाईन देते तु काय करणार आहेस असे म्हणून प्रतिप्रश्न करून त्यालाच उलट उत्तर दिले होते. म्हणून नवरा बायकोने त्याच्या विरोधात पोलीसात तक्रार दिली होती. त्यावेळी पोलीसांनी त्याला समजावून सांगून सोडून दिले होते. याचा परिणाम उलटाच झाला. प्रशांत हा रूपालीला जास्तच त्रास देवू लागला होता.त्यामुळे मारूतीचे ही डोके ठिकाणावर राहिले नाही. त्याच्या डोक्यात प्रशांतला अद्दल घडवायची असा त्याने विचार केला. या अगोदर ही त्या दोघांची भांडणे मारामारी झाली होती. यात मारूतीची काहीच चूक नव्हती. तरी ही गल्लीतील काही लोक मारूतीला तुझी बायकोच चालू आहे तू तिला घरात कोंडून ठेव असे सांगून प्रशांतची बाजू घेत होते. मात्र प्रशांत विषयी मारूतीच्या मनात चिड होती. त्याच्यामुळे गल्लीत समाजात मारूतीची आणि रूपालीची बदनामी होत होती. प्रशांतला समज देवून ही तो काही ऐकत नाही हे त्याला ही माहित होते. प्रशांत ही मारूतीचा राग आलेला होता. तो आपल्याला समज देणारा कोण? यात त्याच्या बायकोची ही चूक आहे ती सुरूवातीला आपल्याला लाईन देत होती. आता मात्र मारूतीच्या सांगण्यावरून ती आपल्याला टाळत आहे असे त्याला वाटत होते. रविवार दि.३०ऑक्टोंबर रोजी रात्री ९ ते १०च्या दरम्यान मारूती हा गल्लीतून शतपावली करीत होता. त्यावेळी नेमका प्रशांत हा त्याचे समोर आला. अगोदरच्या भांडणाचा राग त्याच्या मनात असल्याने व मारूतीने चार चौघात त्याला समज दिल्याने तो ही त्याचेवर चिडून होता. मारूती हा शतपावली करीत असताना प्रशांतने त्याचेवर मागून काठीने हल्ला केला. त्याने काठीने त्याच्या डोक्यात जोरात हाणले. तसा मारूती हा खाली पडला. तो ओरडत खाली पडल्यावर प्रशांतने आपल्याकडील चाकू त्याचे पोटात चाकू खुपसला. तो ओरडत खाली पडला. त्याच्या पोटातून मोठया प्रमाणात रक्ताची धार लागली. तरी ही प्रशांत हा शांत झाला नाही. त्याने तोच चाकू त्याच्या कपाळावर गळ्यावर मानेवर वार केले. त्यासरशी तो जागीच मयत झाला. आपल्या हातून मारूतीचा खून झाला आहे हे लक्षात येताच तो भानावर आला. हे प्रकरण आपल्या अंगावर शेकणार हे त्याने ओळखले. आपल्या बचावासाठी त्याने वेगळाच प्लॅन केला. कुणाच्या ही काही लक्षात येण्या अगोदर त्याने आपल्या घरातून कुऱ्हाड व तलवार आणली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या मारूतीच्या एका हाता जवळ कुऱ्हाड तर दुसऱ्या हाताजवळ तलवार ठेवली जेणे करून भांडणात मारूतीने आपल्यावर पहिल्यादा हल्ला केला आहे. त्याला प्रतिउत्तर देताना आपल्या हातून त्याचा खून झाला आहे असे भासविण्याचां त्याने प्रयत्न केला. काही वेळातच ही घटना आश्रय कॉलनीतील लोकांना समजल्यावर त्यांनी घटनास्थळी गर्दी केली. घटनास्थळावर काही अंतरावर प्रशांत नार्वेकर हा हाताशपणे आपल्या हातात चाकू घेऊन बसला होता. त्यामुळे ही घटना कुणी आणि कोणत्या कारणातून केली आहे याची चर्चा घटनास्थळावर दबक्या आवाजात होत होती. मयत मारूतीची बायको रूपाली हिने घटनास्थळी येवून आराडा ओरडा करून प्रशांतच्या नावे बोंब ठोकली होती. या घटनेची माहिती खानापूर पोलीसांना कुणी तरी दिल्यावर घटनास्थळी पोलीस ही दाखल झाले. पोलीस निरी.सुरेश शिंगी यांनी भेट देत घटनेची माहिती घेतली.रात्री २ च्या दरम्यान बैलहोंगल विभागाचे डीएसपी शिवानंत कटगी यांनी ही भेट देऊन घटनेची माहिती घेतली. त्यांनी पोलीसांना तपासाच्या सुचना दिल्या.पोलीसांनी ही घटनास्थळी फॉरेन्सिक लॅबला पाचारण केले. घटनास्थळी संशयीत आरोपी प्रशांत नार्वेकर हा हाताश पणे बसला होता. पोलीसांनी त्याला ताब्यात घेवून त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने कोणत्या कारणातून ही घटना केली याची माहिती पोलीसांना दिली. घटनास्थळी त्याने केलेला बनाव पोलीसांच्या तपासात उघड झाला. त्यानेच पोलीसांना माहिती देताना सांगितले की, मारूतीचा खून मी त्याच्या बायकोसाठी केला आहे. मागे दोन तीन वेळा त्याच्या बायकोसाठी आमची भांडणे झाली होती. मी त्याच्या बायकोवर लाईन मारत होता. परंतु ती मला हाताला लागत नव्हती. मी त्याच्या बायकोची छेडछाड काढत असल्याने त्याची व आपली पूर्वी भांडणे झाली. त्यानेच पहिल्यांदा आपल्यावर हल्ला केल्याचा बनाव केला आहे हे दाखविण्यासाठी मी त्याच्या एका हाताच्या बाजुला कुऱ्हाड व दुसऱ्या हाताच्या बाजुला तलवार ठेवले होते अशी कबुली त्याने दिली. पोलीसांनी घटनास्थळचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी बेळगावच्या शासकीय रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची फिर्याद मयत मारूतीच्या बायकोने खानापूर पोलीसात दिल्याने पोलीसांनी मारूती उर्फ कृष्णा गणूराव जाधव (वय ४०) याच्या खून प्रकरणी प्रशांत दत्तात्रय नार्वेकर (वय ३५) याच्या विरोधात आयपीसी कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने प्रशांत नार्वेकर याची रवानगी बेळगाव येथील हिंडलगा जेलमध्ये केली. या घटनेचा पुढील तपास खानापूर पोलीस स्टेशनचे पो.निरी.सुरेश शिंगी याच्या मार्गदर्शनाखाली खानापूर पोलीस करीत आहेत. कोणत्या ही पुरूषाला आपल्या बायकोपेक्षा दुसऱ्याची बायको ही आवडत असते. त्यातूनच त्याच्या मनात तिच्या विषयी कामवासना तयार होते. ते तिला आपल्या अंगाखाली घेण्यासाठी तिची छेडछाड काढीत असतात. परंतु बऱ्याच वेळेला त्याची ही छेडछाड त्याच्याच अंगलट येते हेच या घटनेवरून दिसून येते.

## चंचल पत्नीने नातेवाईकालाच पटवले...

ओळखत घटनास्थळाकडे धाव घेत घटनास्थळ गाठले. घटनास्थळावर लोकांनी बरीच गर्दी केली होती. बीट अंमलदार सचिन उस्तुरर्गे घटनेची प्राथमिक माहिती घेऊन आढावा घेतला. तत्काळ संबंधित घटनेची माहिती वरिष्ठांना दिली. किल्लारी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील गायकवाड यांनी ठाण्यातील पोलिस कर्मचाऱ्यांना सोबत घेवून घटनास्थळाकडे धाव घेतली. लामजना गावापासून ३ जे ४ किलोमिटर आंतरावर आसलेल्या तपसेचिचोली-गाडवेवाडी शिवरातील एका शेतात रस्त्याच्या कडेला लोककांची गर्दी दिसत होती. पोलिसांनी कयास काढत पोलिस गाडी गर्दीच्या दिशेने दामटली. काही क्षणातच लामजना पोलीस ठाण्याचे सपोनि सुनील गायकवाड आपल्या कर्मचाऱ्यासह घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळावर दाखल होताच सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील गायकवाड यांनी घटनेची प्राथमिक माहिती घेतली. मयताची ओळख पटविण्यासाठी तेथे उपस्थित असलेल्या काही लोकांना विचारपूस केली. तेंव्हा संबंधित तरुण हा लामजना येथील रहिवाशी असून त्याचे नाव कुमार बलसुरे असल्याची माहिती पोलिसांच्या हाती आली. मयताची ओळख पटल्याने पोलिसांनी काही काळ सुटकेचा निश्वास टाकून पुढील कारवाही सुरू केली. किल्लारी पोलिसांनी तात्काळ लामजना येथे संपर्क करून मयत कुमार बलसुरे यांच्या नातेवाईकास बोलावून घेतले. काही तासाच्या आतच मयत कुमार बलसुरे यांचे नातेवाईक घटनास्थळावर हाजर झाले. मयताला पहाताच नातेवाईकांनी हंबरडा फोडण्यास सुरुवात केली. दरम्यान घटनास्थळावर औसा उपविभागीय पोलीस अधिकारी मधुकर जवळकर यांनी भेट देऊन घटनेची प्राथमिक माहिती जाणून घेतली. तसेच उपस्थित असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना आणी कर्मचारी यांना योग्य त्या सूचना करून पंचनामा करण्यास सांगितले.पोलिसांनी पंचनामास करण्यास सुरुवात केली. मयताच्या तोंडावर , ओठावर मार लागल्याच्या खुना दिसत होत्या. यावरून पोलिसांनी हा घातपाताचा प्रकार आसाव असा अंदाज लावला होता. पोलिसांनी घटनास्थळावरील आवश्यक ती माहीती हास्तगत करत प्रेत उत्तरणीय तपासासाठी शासकीय रूग्णालयात पाठविण्याची तजबिज केली. प्राथमिक वैद्यकिय अवहालात मयत कुमार यांचा नाक व तोंड दाबल्याने मृत्यू झाल्याचा अवहाल प्राप्त झाला. यावरून मयताचा भाऊ भागवत बळीराम बलसूरे वय ३८ वर्षे धंदा - मजूरी रा तपसे चिंचोली यांच्या तक्रारीवरून अज्ञात मारेकऱ्यांनी अज्ञात कारणासाठी कुमार बलसूरे यांचा खून केला अश्या तक्रारीवरून किल्लारी पोलिस ठाण्यात गु.र.नं. व कलम २३३ /२०२२ कलम.३०२,१२० (ब),३४ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

लातूर जिल्हा अप्पर पोलीस अधीक्षक अनुराग जैन, औसा उपविभागीय पोलिस अधिकारी मधुकर जवळकर.,यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची सर्व सूत्रे किल्लारी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड यांच्या हाती देण्यात आले. किल्लारी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील गायकवाड यांनी या प्रकरणातील प्राथमिक माहिती हाती घेण्यासाठी एक पोलिसांचे पथक तयार केले. या पथकात पीएसआय राजपूत, पोलीस हवालदार सचिन उस्तुर्गे, आबासाहेब इंगळे, किसन मर्डे, धनराज कांबळे, अरुण मुळे ,महिला पोलीस कर्मचारी मीरा जाधव ,अपर्णा साळुंखे यांचा समावेश करण्यात आला. या पथकाने या खून प्रकरणातील प्राथमिक माहिती घेण्यासाठी तपसे चिंचोली हे गाव गाठले मयत कुमार बलसुरे मयत कुमार बलसुरेमयत कुमार बलसुरे हा मूळचा तपसे चिंचोली येथील रहिवासी होता. कुमार हा लहानपणापासून प्रामाणिक आणि कष्टाळू मुलगा होता. तो वडीलोउपार्जित असलेल्या शेती तो काम करत होता. तर कधी कधी तू इतरांच्या शेतात जाऊन शेतमजुरी करत होता. कुमार हा थोडासा भोळसर स्वभावाचा होता. गेल्यास सात ते आठ वर्षांपूर्वी औसा तालुक्यातील उत्का या गावातील कमल नावाच्या मुलीशी त्याचा विवाह झाला होता. विवाह नंतर कमल आणि कुमार यांचा संसार सुखाचा चालला होता. दरम्यानच्या काळात त्यांना दोन मुले ही झाली होती. कुमार दररोज मजुरी करून आपल्या संसाराचा गाडा चालवत होता. कमला पण कुमार याला कामात मदत करत होती. कमला तशी चंचल स्वभावाची होती. त्यामुळे तीची नजर सारखी भिरभिरत होती. ती सारखी माहेरी उत्का या गरवी जरत होती. अशात ती लामजना या आपल्या मामाच्या गावी सारखी जायला लागली होती. कमलाच्या मामाचा मुलगा विष्णू शंकर सुर्यवंशी उर्फ लांडगे हा ही कमलाला आधून मधून मोटरसायकलीवरून गावाकडे घेवून जात होता. मर कधी कधी मोटरसायकलीवरून तपसेचिंचोली येथे आणून सोडत होता. अशात तो एक दिवसाआड चिंचोली येथे कमलाकडे येत होता. पण मामाचा मुलगा आसल्याने आणी नात्यातला आसल्याने त्याच्यावर कोणीही कुमार किंवा कुमारचे नातेवाईक संशय घेत नव्हते.एवढी माहीती स्तिगत करून पोलिसांनी किल्लारी गाठली. साहाय्यक पाकलिस निरीक्षक सुनील गायकवाड यांनी सगळी माहीती एकत्र करून तपासाची दिशा ठरविली. एका गुप्त खबऱ्याकडून सपोनि गायकवाड यांना या गुन्ह्यातील खास माहीती मिळाली. या खुनप्रकरणाचे धागेदोरे कमला भोवतीच फि रत होते. सपोनि यांनी तंत्रीक ाबींचा अभ्यास करून या प्रकरणातील संशयीत आरोपी विष्णू शंकर सुर्यवंशी उर्फ लांडगे याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक विचारपूस केली असाता त्यांने असमाधाकारक उत्तरे दिली. त्यला विश्वसात घेवून विचारले असता त्यांने सांगण्यास सुरूवात कली. मी, कमला आणी अन्य दोघांनी कुमारचा काढ काढल्याचे कबूल केले. कमला ही सारखी मामाच्या गावी येत होती. तेंव्हापासून विष्णू आणी कमला यांचे सुत जुळले होते. वेळ मिळेल तस कमला आणी विषणू मजा मारत होते. कुमारच्या भोळसरपणाचा दोघांनीही राजरोसपणे फ ायदा घेणे चालू केले होते. मात्र गावातील लोकांना याची खबर लागली होती. त्यामुळे दिवसा घरी येणार विष्णु रात्री-बेरात्री कमलाच्या घरी येत होता. पण कुमार जागीच आसल्याने या दोघांच्या श्यात आडथळा निमाणे होत होता. दरम्यान कमला आणी विषणू वासनेत बेधुंद झाले होते. कुमारचा कायमचा काटा काढून यांचा मार्ग मोकळा करायचा होता. कमला आणी विष्णूने बेत आखला. विष्णूने त्यांचे जुने मित्र यांना भेटून आपली कल्पान सुचवली. त्यांनी या कामासाठी होकार दिला. लामजना गावात विटभट्टीवर काम करणारे विष्णुचे मित्र विजय (शेरू) साहेबराव गवळी व योगेश बळी कांबळे यांना तीस हाजारीची सुपारी देवून कुमारचा काटा काढण्याचे ठरले. विष्णू यांने विजय गवळी आणी योगेश कांबळे याना याकामाचे अॅडवान्स म्हणून दहा हजार दिले. ठरल्याप्रमाणे १ नोंव्हेबरच्या रात्री विजय आणी योगेश तपसेचिंचोली येथे आले. यांनी कुमारला घरीच गाठले. आम्ही तुमचे पाहूणे आहोत लामजन्याला जायच आहे चला असा आग्रह घरला. कुमार भोळ्या स्वभावाचा आसल्याने तो चटकन राजी झाला. योगेश, विजय आणी कुमार हे तिघेजण मोटार सायकलीवरून तपसचिचोली-गाडवेवाडी मर्गे निघाले. गाडवेवाडी शिवारात येताच गाडी बंद पडल्याचे निमीत्त करून हे खाली उतरले. संधीचा फ ायदा झेत कुमारचे नाक तोंड दाबून धरले. दोघांच्या शक्तीपूढे कुमार हातबल झाला. थोड्या झटरपटीनंतर कुमार कायमचा शांत झाला. कुमार शांत झाल्याचे पाहून दोघेही पळून गेले. या प्रकरणी पोलिसांनी कमला आणी अन्य दोघांनाअटक केली असुन पुढील तपास सपोनी सुनील गायकवाड हे करीत आहेत.



## वलांडी येथील सय्यद इरादत्तुल्ला शाह कादरी दर्ग्याचे ८२ वे संदल संपन्न

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील वलांडी येथील सय्यद इरादत्तुल्लाह शाह कादरी दर्ग्याचे ८२ वे संदल मंगळवार दि.१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी मोठ्या उत्साहात वाजतगाजत संपन्न झाला. नेहमी प्रमाणे याहीवर्षी संदल शब्बीर पठाण यांच्या जुन्या घरापासून वाजतगाजत नात, कवालीच्या गजरात निघून वलांडी बाजारपेठेतून बसस्थानक चौकातून सय्यद इरादत्तुल्लाह शाह कादरी दर्गा परिसरात पोहोचले. त्यानंतर सय्यद इरादत्तुल्लाह शाह यांच्या मजार शरिफवर झेला व चादर चढविण्यात आले व फातेहाखानी कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मौलाना हाफिज ताजोद्दीन, माजी आमदार धर्माजी सोनकवडे, बालाजी सोनकवडे, बाबुलाल पठाण, मजरोद्दीन बौडीवाले, युनूस नरुणे, रिपाई माजी तालूका अध्यक्ष विलास वाघमारे, अरूण पाटील, शफिक सौदागर, विशाल फुलारी, साजीद पठान, साबेर पठान, तौफीक जमीनदार, यांच्यासह आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संदल मिरवणुकीत सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज शिनगारे यांच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## शिपाई पदासाठी दरपत्रके पाठविण्याचे आवाहन

लातूर : लातूर नगर रचना कार्यालयातील वर्ग चारची शिपाई (अकुशल) दोन पदे स्थानिकरित्या बाह्यस्त्रोताव्दारे कंत्राटी तत्त्वावर भरण्यात येणार आहेत. शासन निर्णयानुसार नेमलेल्या मान्यताप्राप्त खासगी संस्था, कंपनी यांनी शिपाई (०२) पदे भरण्याकरिता ९ नोव्हेंबर २०२२ पर्यंत वेतन व भत्ते सर्व तपशीलासह दरपत्रके सीलबंद पाकिटात सादर करण्याचे आवाहन नगर रचना विभागाचे सहायक संचालक सु.प्र.मिटकरी यांनी केले आहे. शिपाई पदाकरिता उमेदवार हा किमान चौथी पास असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराची सेवा ही केवळ तात्पुरत्या कंत्राटी स्वरूपात अकरा (११) महिन्याच्या कालावधीसाठी उपलब्ध करून घेण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

07 TO 13 NOVEMBER 2022 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 11/5/2022 9:23 PM Page 1



### भ्रष्टाचार निर्मूलनासाठी दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन

# जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शपथ घेऊन केली 'दक्षता जनजागृती सप्ताहा'चा शुभारंभ



**पालघर/प्रतिनिधी**

सार्वजनिक जीवनामध्ये लोकसेवकांनी प्रामाणिकपणे तसेच पारदर्शकपणे जनतेची कामे करण्यासाठी प्रेरणा मिळावी यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये अधिकारी व कर्मचारी यांनी सामूहिक रित्या शपथ घेतली. जीवनाच्या सर्व क्षेत्रात सच्चेपणा आणि कायद्याचे पालन करेन, लाच घेणार नाही आणि लाच देणार नाही, सर्व कामे प्रामाणिकपणे आणि पारदर्शक पध्दतीने करेन, जनहितासाठी कार्य करेन अशी प्रतिज्ञा घेऊन भ्रष्टाचाराविरुध्द जनजागृती होण्याच्या उद्देशाने आज जिल्हाधिकारी कार्यालय येथील जिल्हा नियोजन सभागृहामध्ये दक्षता जनजागृती सप्ताहाचा प्रारंभ करण्यात आला. राज्यपाल भगत सिंह कोश्यारी व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त जनतेला दिलेल्या संदेशाचे वाचन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेतली. सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी गोविंद बोडके,निवासी उपजिल्हाधिकारी किरण महाजन आणि अँटी करप्शन ब्युरोचे उपअधीक्षक नवनाथ जगताप, पोलीस निरीक्षक स्वपन बिश्वास यांच्या उपस्थित शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबत भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेतली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. दरवर्षी ३१ ऑक्टोंबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती असते, या जयंती सप्ताहात दक्षता जनजागृती सप्ताह साजरा केला जातो. सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा आणि सत्यनिष्ठा यांबद्दलच्या दृढनिश्चयाचे बळकटीकरण करण्यासाठी नागरिकांच्या सहभागाने हा सप्ताह साजरा करण्यात येतो. यंदाच्या २०२२ या वर्षी हा सप्ताह केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार दिनांक ३१ ऑक्टोबर २०२२ ते ६ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. या दक्षता जनजागृती सप्ताहाचे बोधवाक्य भ्रष्टाचार मुक्त भारत-विकसित भारत असे आहे.

# भिवंडीत दोघा सराईत गुन्हेगारांना ताब्याचे घेत पिस्टल आणि पाच जिवंत काडतुसे जप्त करण्यात शांतीनगर पोलिसांना यश

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी पोलोस परिमंडळ क्षेत्रात जबरी चोरी चैन स्नाचिंग मोबाईल हिसकावण्याच्या घटना वाढीस लागल्याने पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण व सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर खैरनार यांनी पोलीस अधिकाऱ्यांना नाकाबंदी गस्ती वाढविण्याच्या सक्त सूचना दिल्या नंतर शांतीनगर पोलिसांनी गस्ती दरम्यान दोघा सराईत गुन्हेगारांना ताब्यात घेत त्यांच्या जवळून एक पिस्टल पाच जिवंत कडतुस जप्त करण्यात यश मिळविले आहे. शांतीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक निलेश जाधव व पोलिस पथकातील तुषार वडे व किरण मोहिते हे टेमघर पाईपलाईन या भागात गस्त घालीत असताना पोलीस हवालदार तुषार वडे यांना दोन संशयित व्यक्ती गावठी बनावटीची पिस्टल व काडतुस सोबत बाळगुन भादवड नाका ते सोनाळे या रस्त्यावर येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना पिस्टलचा धाक दाखवुन त्यांचे कडील सोनसाखळी, पैसे व मोबाईल फोन जबरीने चोरत आहेत व येणाऱ्या भिवंडी महानगरपालिका निवडणुकी दरम्यान घातपात घडवून आणण्याच्या उद्देशाने



कोणास तरी त्या पिस्टलने जीवे मारणेची सुपारी घेतली आहे अशी माहिती गुप्त बातमीदाराने दिली.त्यानुसार तात्काळ प्रभारी वरीष्ठ पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांना फोनव्दारे याची माहिती देवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने लक्ष्मण म्हात्रे चौक भादवड गांव भिवंडी येथुन सापळा लावुन आशिष आदित्यनाथ श्रीवास्तव वय ३६, रा.रांजणोली नाका, भिवंडी मुळगांव राऊतपार, जिल्हा संत कबीरनगर, उत्तरप्रदेश व शुभम विरेंद्र मिश्रा वय २५, रा.भादवड गांव भिवंडी मुळगांव भौसोली जिल्हा जौनपुर उत्तरप्रदेश यांना अतिशय कौशल्यपूर्वक ताब्यात घेतले. त्यांचे जवळून पिस्टल पाच जिवंत काडतुसे व गुन्हे कामी वापरली जाणारी दुचाकी असा ८२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दोन्ही आरोपींविरोधात शांतीनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. यापैकी आरोपी आशिष आदित्यनाथ श्रीवास्तव हा सराईत गुन्हेगार असून त्याविरोधात पुणे जिल्ह्यातील शिरूर पोलीस ठाणे येथे घरफोडी चोरीच्या दोन गुन्ह्यांची नोंद आहे.तर तो भिवंडी येथे टाटा स्काय डिश लावण्याचे काम करीत होता. त्यामुळे या अटक आरोपींनी सदर पिस्टल कोठुन खरेदी केले, यापुर्वी त्यांनी त्याचा वापर केला आहे का तसेच त्याचा वापर करून आणखी कोणते गुन्हे करणार होते याबाबत अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक निलेश जाधव हे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

# राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त एकता दौंड संपन्न




**पालघर** : सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त एकता दौडचा शुभारंभ जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांच्या हस्ते झाला. या कार्यक्रमास पालघरचे तहसीलदार सुनील शिंदे, नायब तहसीलदार केशव तरंगे, गंगाधर जामनिक, अधिकारी व कर्मचारी तसेच एनसीसी चे विद्यार्थी उपस्थित होते. या ३ की. मी. दौड चा मार्ग हुतात्मा चौक ते साई रेसिडंसी हॉटेल ते हुतात्मा चौक असा होता. हुतात्मा चौक येथे एकता दौडचा समारोप करण्यात आला.

# चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांच्या हस्ते ट्वेंटीवन शुगर मळवटीच्या युनिट १ चे बॉयलर अग्निप्रदीपन

**लातूर/प्रतिनिधी**

विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते व माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार तथा ट्वेंटीवन शुगर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष अमित विलासराव देशमुख व लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर तालुक्यातील मळवटी येथील ट्वेंटीवन शुगर युनिट १ चे बॉयलर अग्नीप्रदीपन संपन्न झाले. यावेळी ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, व्हाईस प्रेसिडेंट समीर सलगर, जितेंद्र स्वामी, विपिन देशमुख, गोविंद देशमुख शेतकी अधिकारी सुभाष कल्याणकर आदीसह संबंधित विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. लातूर जिल्हयासह मराठवाडयात यावर्षी देखील समाधानकारक पाऊस पडला आहे, यामुळे या हंगामामध्ये देखील मोठया प्रमाणात ऊस उपलब्ध होत आहे. या संपूर्ण ऊसाचे वेळेवर गाळप करण्यासाठी गळीत हंगामाची जय्यत तयारी करण्यात आली आहे, अशी माहिती ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस प्रेसिडेंट समीर सलगर यांनी दिली आहे. लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार तथा




ट्वेंटीवन शुगर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष अमित देशमुख व लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी येणारा गळीत हंगाम यशस्वीतेसाठी शुभेच्छा दिल्या. प्रारंभी विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांच्या हस्ते कारखाना परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

# जूनपासून बल्लारपूर येथे सुरु होणार एसएनडीटी विद्यापीठाचे केंद्र



**मुंबई/प्रतिनिधी**

महिलांना शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात एसएनडीटी विद्यापीठाचा मोठा वाटा आहे. शंभर वर्षाहून अधिक काळ झालेल्या एसएनडीटी विद्यापीठाचे केंद्र येत्या जूनपासून चंद्रपूर जिल्हयातील बल्लारपूर येथे सुरु करण्यात येणार आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी याविषयी सातत्याने पाठपुरावा केला होता. येणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून येथे रोजगारभिमुख आणि कौशल्यधारित अभ्यासक्रम सुरु करण्याला प्राधान्य देण्यात येणार असल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. श्री पाटील यांच्या निवासस्थानी मंगळवारी यासंदर्भात झालेल्या बैठक झाली व निर्णय घेण्यात आला. एस.एन.डी.टी.अर्थात श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाचे केंद्र चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर येथे सुरु करण्यासंदर्भात सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आज आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला चंद्रपूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विनय गौडा, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरु प्रा. उज्ज्वला चक्रदेव, उच्च व तंत्रशिक्षण संचालक धनराज माने यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. श्री. मुनगंटीवार म्हणाले की, एसएनडीटी विद्यापीठाचा आतापर्यंत ७ राज्यांमध्ये विस्तार झालेला आहे. वेगवेगळे शैक्षणिक, रोजगारभिमुख आणि कौशल्यधारित अभ्यासक्रमांना आज मागणी आहे. त्यामुळे चंद्रपूर आणि येथील परिसरातील विद्यार्थीनीना आवश्यक असणारे साधारण १० अभ्यासक्रम या विद्यापीठातून शिकविण्यात येतील. एसएनडीटी विद्यापीठाचे केंद्र बल्लारपूर येथे सुरु करण्यासाठी आवश्यक असणारी जागेची पाहणी, साधनसामुग्री तसेच केंद्र सुरु झाल्यानंतर आवश्यक असणारे मनुष्यबळ, शिक्षित प्राध्यापक याबाबतचा आढावा प्रत्यक्ष घेण्यात येईल. नवीन शैक्षणिक वर्ष जूनपासून सुरु होत असल्याने प्राथमिक टप्प्यात चंद्रपूर येथे असलेल्या अत्याधुनिक दोन शाळांमध्ये अभ्यासक्रम सुरु करण्यात येतील. देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि एसएनडीटी विद्यापीठाने पार केलेली शताब्दी याचा मेळ घालून काही नवीन उपक्रमही विद्यापीठामार्फत सुरु करण्यावर भर देण्यात येईल असेही श्री. मुनगंटीवार यावेळी म्हणाले. श्री. पाटील म्हणाले की, चंद्रपूर येथील बल्लारपूर येथे एसएनडीटी केंद्र सुरु करण्यासाठी आवश्यक निधीबाबत सविस्तर प्रस्ताव करावा. तसेच सध्या पहिल्या टप्प्यात आवश्यक निधी सामाजिक उत्तरदायित्व निधी, जिल्हा नियोजन निधी याव्यतिरिक्त कसा उभा करता येईल याबाबतही सविस्तर प्रस्ताव उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे तातडीने सादर करण्यात यावा. आवश्यक पदभरती होईपर्यत करार पध्दतीवर नेमणूका करुन काम सुरु करण्यात यावे. स्थानिक रहिवाशांना भरतीमध्ये प्राधान्य देण्यात यावे. दुर्गम भागातील हे केंद्र महिलांना आर्थिकदृष्ट्या आणि शैक्षणिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महत्वाचे ठरेल, असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला.

# 'देशिकेंद्र'च्या विद्यार्थ्यांचा २१ वर्षांनी जमला मेळावा



**लातूर/प्रतिनिधी**

येथील देशिकेंद्र विद्यालयात शैक्षणिक वर्ष २००० - २००१ मध्ये दहावीच्या वर्गात शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांनी त्यावेळच्या शिक्षकांसह एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला. सर्व विद्यार्थ्यांनी संपूर्ण दिवस शाळेसाठी देत शाळेचा परिसर व वर्गखोल्यांमध्ये बसून उत्साहपूर्ण वातावरणात स्नेहमेळावा केला. यानिमित्त शाळेच्या परिसरात माजी विद्यार्थ्यांच्यावतीने सुरेख रांगोळी साकारण्यात आली. सनई - चौघड्याचा नाद शाळेच्या परिसरात घुमत होता. आलेल्या माजी विद्यार्थी व माजी शिक्षकांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी सर्व माजी विद्यार्थी आणि शिक्षकवृंदांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकर बिडवे, शिवशंकर खानापुरे, मुख्याध्यापक सगर, उपमुख्याध्यापक भुजबळ, ज्योती मंगलगे, पाटील, जी. एस. बुरांडे, सांडे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रेणुका धानोरकर यांनी केले. मागील २० वर्षांपूर्वी शाळेच्या परिसरात बागडणारे विद्यार्थी आज आपापल्या क्षेत्रात उच्च पदावर पोहोचले आहेत. प्रत्येकाने नवे विश्व शोधण्याचा प्रयत्न केला आहे. देशिकेंद्र विद्यालय ही केवळ इमारत नसून ती भवितव्य उज्ज्वल करणारा एक विचार आहे, अशी भावना यावेळी इम्रान सय्यद, आरती गोविंदपूरकर, परमेश्र्वर येणकीकर, विवेकानंद पेठकर, ऋषिकेश पाटील, शशिकांत माने या माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. यावेळी ऋचा गुडे, योगिता मिरजगावे, सचिन वैद्य, योगेश मिरजगावे यांनी सहज बोलण्यातून कार्यक्रमाची रंगत वाढविली. कार्यक्रमाचे निवेदन माधवी पंचाक्षरी, सुशील साबणे यांनी केले. हा स्नेहमेळावा स्नेहसोहळा होण्यासाठी प्रियांका बामनकर, शीला आडे, लक्ष्मीकांत पाटील, चेतन चावरे, शिवकुमार चवरे, कौस्तुभ ताथोडे, श्रीकांत नागुरे, सूरज पाटील, विपिन थोरमोटे, इम्रान सय्यद, गणेश पाटील, राजकुमार नाईकवाडे आदींनी परिश्रम घेतले. यावेळी फटाक्यांची आतषबाजी करीत अविस्मरणीय दिवसाची सांगता करून अनेक जुन्या आठवणी मनात ताज्या करून घेत पुन्हा एकत्र येण्याच्या आश्वासनावर एकमेकांचा निरोप घेण्यात आला.

# कल्याण नाक्यावरील गटार तुंबल्याने नागरिक हैराण



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी महापालिकेच्या वतीने पावसाळ्यापूर्वी शहरातील गटार व नाळे यांची साफसफाई करण्यात येत असते, शहरातील नाले व गटारांच्या सफाईसाठी महापालिका प्रशासनाकडून दरवर्षी कोट्यावधी रुपये खर्च करण्यात येत असतात, मात्र कंत्राटदार व अधिकारी यांच्या संगनमताने नालेसफाई थातुरमातुर स्वरूपात होत असते. पावसाळा संपताच भिवंडीतील अनेक गटारे पुन्हा तुंबल्याचे परिस्थिती शहरात उद्भवली आहे. भिवंडीतील महापालिकेच्या जवळ असलेल्या कल्याण नाका परिसरातील गटार तुंबल्याने नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे. याच गटारा बरोबरच शहरातील इतर नाल्यांची परिस्थिती देखील अशाच प्रकारची झाल्याने महापालिका प्रशासनाने केलेली नालेसफाई व त्यावर केलेला कोट्यवधीरुपयांचा खर्च शहरात चर्चेचा विषय बनला असून शहरात नालेसफाईचा कशाप्रकारे बोजवारा उडाला आहे याचे चित्र शहरातील गटार व तुंबलेल्या नाल्यांमध्ये दिसून येत आहे.

# वाड्यातील आवंढे येथे नदीत बुडून दोघांचा दुर्दैवी मृत्यू

**वाडा/प्रतिनिधी**



वाडा तालुक्यातील आवंढे येथील वैतरणा नदीत दोन तरुण अंघोळीसाठी गेले असता नदीच्या खोलीचा अंदाज न आल्याने दोघांचा दुर्दैवी मृत्यु झाला आहे. सुनिल बाबू डिके (३० वर्षे) कार्तिक जानू कोदे (१७ वर्षे) असे मयत तरुणांची नावे असून सुनिल डीके हा सुरतचा राहणारा आहे तर कार्तिक कोदे हा ठाणे येथील रहिवासी आहे. शुक्रवारी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास आवंढे येथील वैतरणा नदीच्या पात्रातील चाचुच्या बंधाऱ्यावर दोघेजण आंघोळीसाठी पाण्यात उतरले असता कार्तिक वाहून जात असल्याचे पाहून सुनिल पाण्यात उतरला मात्र त्यालाही पोहता येत नसल्याने तोही बुडायला लागला होता. येथील गाकऱ्यांनी त्याला बाहेर काढले मात्र कार्तिक आहून गेला होता. सुनिल डीके याला खानिवली येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे उपचारासाठी दाखल केले तेथून वाडा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे. तर रात्री उशिरा पर्यत कार्तिकला शोधण्याचे काम सुरु होते. शनिवारी सकाळी कार्तिकचा मृतदेह आढळून आला असून दोघांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी वाडा ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत.

# वाडा तालुका विधी सेवा समितीच्या वतीने कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम



वाडा: वाडा तालुका विधी सेवा समिती व वाडा तालुका वकील संघाच्या वतीने कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन वाडा नगर पंचायतीच्या सभागृहात करण्यात आले होते. आयोजित कार्यक्रमामध्ये वाडा वाडा तालुका वकील संघाचे अध्यक्ष अँड. जितेंद्र गायकवाड, अँड.राजेश भोईर यांनी सर्वसामान्यांच्या मूलभूत हक्कांबाबत मार्गदर्शन केले. तर वाडा न्यायालयाचे न्यायाधीश आर.व्ही.निकम यांनी कौटुंबिक व इतर कायदेविषयक मार्गदर्शन केले. याप्रसंगी अँड. अविनाश साळवे, अँड.जितेंद्र गायकवाड, अँड. राजेश भोईर, नगर पंचायतीचे अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

## वाडा भिवंडी महामार्गावर शॉर्ट सर्किट मुळे धावत्या कंटेनला आग

वाडा: वाडा भिवंडी महामार्गावर मेट येथे रात्री आठ वाजताच्या सुमारास गुजरातहून कोल्हापूरकडे नमकीन वेफर घेऊन जाणाऱ्या कंटेनरला भीषण अशी आग लागली. कंटेनरला आग लागल्याचे लक्षात येताचा चालकाने तब्बल दोन किलोमीटर पर्यत कंटेनर पळवत थेट वॉशिंग सेंटर वर पोहोचवला या ठिकाणी स्थानिक ग्रामस्थांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मोठा अनर्थ टळला असून या आगीत कंटेनरमध्ये असलेल्या लंच बॉक्स या कंपनीचा संपूर्ण मुद्देमाल जळून खाक झाला आहे.

**जिल्हा परिषद पालघर**

**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/२३५/२०२२ दिनांक : १४/१०/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर यांचेकडील मौजे बाडा पोखरन ता. डहाणू व २८ गावे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना दैनंदिन प्रचलन, वापर व देखभाल दुरुस्ती करणे. या कामाची जाहीर ई-निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक २९/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक १२/११/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**(जी.पी. निवडंगे)**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद, पालघर**

# अंधभक्तांच्या भरोशावर!

गुजरात आणि हिमाचल प्रदेशात विधानसभा निवडणुकीची घोषणा झाली आहे. हिमाचल प्रदेश मधील आजवरचा इतिहास पाहता तिथे परिवर्तन होण्याची शक्यता आहे. तिथली भाजपची सत्ता जाऊ शकते. मात्र तिथे भाजपा पूर्णपणे अंध भक्तांच्या भरोषवर आहे. म्हणून तर योगी आदित्यनाथ तिथे तळ ठोकून आहे. मात्र योगीच्या भाषणात विकास आणि जनतेच्या समास्यापेक्षा रम मंदिर, हिंदुत्व हेच मुद्दे अधिक आहेत आणि अंध भक्तांना भुलवण्यासाठी सध्या हेच मुद्दे भाजपसाठी महत्वाचे ठरत आहेत. अन्यथा हिमाचल प्रदेशातील जनतेच्या मनात काय होते ते मागील पोट निवडणुकीत जनतेने दाखवून दिले आहे याचा अर्थ हिमाचलमध्ये भाजपच्या सत्ताकाळात कामे झालेली नाहीत आणि म्हणून तर राम मंदिर, हिंदुत्व हे भाजपच्या प्रचाराचे मुद्दे बनले आहेत. हिमाचलमध्ये जर विरोधक एकत्र असते तर यावेळी निश्चितपणे परिवर्तन घडले असते. अजूनही काही सांगता येत नाही, पण विरोधकांच्या मतांमध्ये फूट पडणार हे नक्की! कारण हिमाचलच्या निवडणुकीत काँग्रेस प्रमाणेच आम आदमी पक्षाने सुद्धा जोर लावला आहे. अशावेळी विरोधकांची मते विभागली गेली, तर भाजपचा मार्ग मोकळा होईल. तोच प्रकार गुजरातमध्ये आहे. गुजरातच्या १८२ जागांसाठी १ आणि ५ डिसेंबर अशा २ टप्प्यात निवडणूक होणार आहे. गुजरात हा भाजपच्या अंध भक्तांचा गड आहे. असे असतानाही २०१७ मध्ये भाजपला १०० जागाही मिळाल्या नाहीत. याउलट काँग्रेसने ७७ जागा जिंकल्या होत्या. त्यामुळे काँग्रेस सुद्धा गुजरातमध्ये बऱ्यापैकी सुस्थितीत आहे हेच दिसून येते. यावेळी भाजपने गुजरातमध्ये १५० प्लसचा नारा दिला आहे. पण भाजपचे हे असले अती आत्मविश्वासाने नारे कुठेही यशस्वी झालेले नाहीत. गुजरामध्ये भाजपने दोन मुख्यमंत्री बदलले. विजय रूपांनी यांना काही कारण नसताना तडकाफडकी बदलून त्यांच्या जागी भूपेंद्र पटेल यांना आणले. त्यामुळे रूपांनी यांचे समर्थक नाराज आहेत. पण हार्दिक पटेल यांना भाजपमध्ये घेऊन पाटीदार समाजाला आपल्याकडे खेचण्याचा जो डाव भाजपने आखला होता तो फारसा यशस्वी झाला नाही. कारण हार्दिक पटेल स्थानिक भाजप नेत्यांना नको आहे. त्यामुळे हार्दिक सुद्धा भाजपच्या कार्यक्रमांना हजर नसतो, अशावेळी निवडणूक प्रचारात भलेही हार्दिक उतरला तरी त्याचा किती उपयोग होईल हे सांगता येत नाही. त्यातच मोरबी पूल दुर्घटनेमुळे गुजरातमध्ये सत्ताधारी भाजप विरुद्ध गुजराती जनतेत नाराजी आहे. या नाराजीचा मोठा फटका भाजपला बसणार होता. पण इथेही हिमाचल प्रमाणे विरोधकांत ऐकी नाही. काँग्रेस आणि आम आदमी यांच्यामध्ये विरोधी पक्षाची मते फुटणार आहेत. केजरीवाल यांनी गुजरातमध्ये खूप जोर लावला आहे, पण त्याला यश येणे कठीण आहे. विरोधी पक्षांची मते जर फुटली नसती तर भाजपचा गुजरातमध्ये पराभव अटळ होता. पण आता तसे होणार नाही यात काँग्रेसचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. मागच्या वेळेला काँग्रेसने गुजरातमध्ये ७७ जागा जिंकल्या, पण भाजपने फोडाफोडी करून काँग्रेसला ६३ वर आणले आहे. मागच्या वेळेस आम आदमी पक्षाला गुजरातमध्ये एकही जागा मिळाली नव्हती. संपूर्ण १८२ मतदार संघात आम आदमी पक्षाला फक्त २५ हजार मते मिळाले, पण यावेळी स्वतः केजरीवाल गुजरातमध्ये मुक्कामाला आहेत. दुसरीकडे राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेचा चांगला परिणाम होतोय. त्यामुळे काँग्रेसला पुन्हा चांगले दिवस येतील पण आम आदमी किती जागांवर झाडू फिरवतो यावर काँग्रेसचे सारे काही अवलंबून आहे. जर केजरीवाल यांना चांगला प्रतिसाद मिळाला तर ते भाजपचे नुकसान करण्याऐवजी काँग्रेसचे नुकसान करेल आणि भाजपचा फायदा होईल. थोडक्यात हिमाचल प्रदेश आणि गुजरातमध्ये आम आदमी आणि काँग्रेसच्या वादात भाजपचा फायदा होणार आहे. कारण भाजपची अंध भक्तांची जी कायमची मते आहेत ती कुठेच जाणार नाहीत, त्यामुळे भाजप दोन्ही ठिकाणी अंध भक्तांच्या भारोशावर आहे. कोणतीही निवडणूक हि विकासाच्या मुद्यावरच लढवली जायला हवी. पण दुर्दैवाने २०१४ च्या नंतर या देशात अशी काही परिस्थिती निर्माण झाली आहे कि विकासापेक्षा जात धर्म प्रांत यासारखे मुद्दे महत्वाचे बनले आहेत. त्यामुळे लोकांचे जे मुळ प्रश्न आहेत ते बाजूलाच पडले आहेत. परिणामी भ्रष्टाचारासारख्या महत्वाच्या प्रश्नावर चर्चा होत नाही. पंतप्रधान मोदिंनी भ्रष्टाचाराच्या विरुद्ध म्हणे लढाई छेडली आहे, पण ज्यांची इडी, आयकर विभाग, आर्थिक गुन्हे शाखा यांच्या सारख्या तपास यंत्रणांकडून चौकशी सुरु आहे ते दुसऱ्या पक्षातले लोक भाजपात जाऊन पावन होत आहेत. ज्या महिलेची इडी कडून गंभीर आर्थिक गुन्ह्यात चौकशी सुरु आहे तिच्या कडून पंतप्रधान राखी बांधून घेत आहेत, मग कसा विश्वास ठेवायचा भ्रष्टाचार विरुद्ध मोहिमेवर आणि म्हणूनच या सगळ्यांवरून लक्ष विचलित करण्यासाठी देवा धर्माच्या नावाने भाजपने अंध भक्त तयार केले आहेत जे मोदींना देव मानतात आणि याच अंध भक्तांच्या जोरावर भाजपा सर्व निवडणुका जिंकणार आहे.

## कौशल्य विद्यापीठाच्या माध्यमातून युवकांचे सक्षमीकरण व कौशल्य विकास

# सर्वांच्या सहभागातून विद्यापीठाला आदर्श विद्यापीठ बनवू -राज्यपाल भगतसिंह कोश्यारी



**मुंबई/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या माध्यमातून राज्यातील युवकांचे सक्षमीकरण आणि त्यांचा कौशल्य विकास होईल, त्यामाध्यमातून राज्यात कुशल रोजगार आणि स्वयंरोजगार निर्मितीच्या चळवळीला मोठी गती प्राप्त होईल. सर्वांच्या सहभागातून या विद्यापीठाला आदर्श विद्यापीठ बनवू, असे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले. राज्यात विशेषत: शहरी भागात केंद्रीत झालेली कौशल्य विकासाची चळवळ ग्रामीण भागात पोहोचविण्यासाठी येत्या सहा महिन्यात राज्यातील ग्रामीण भागात एक हजार कौशल्य केंद्र सुरु करण्यात येतील, अशी घोषणा यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केली. आज एलफिस्टन टेक्निकल महाविद्यालयात झालेल्या कार्यक्रमात राज्यपाल श्री. कोश्यारी यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांचा प्रारंभ करण्यात आला, त्यावेळी राज्यपाल बोलत होते. यावेळी नोबेल पुरस्कार विजेते शास्त्रज्ञ रिचर्ड जे. रॉबर्टस्, कौशल्य विकास आयुक्त डॉ. रामास्वामी एन., विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. अपूर्वा पालकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

कौशल्य विकासाच्या कार्यक्रमाला अधिक बळकटी देण्यासाठी राज्यात महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे. या विद्यापीठात नवनवीन अभ्यासक्रम सुरु होत आहेत. यामध्ये प्रामुख्याने आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सिक्युरिटी, मशीन लर्निंग, बिझनेस इंटेलिजन्स आणि इनोव्हेशन, बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (BB), न्यू व्हेंचर मॅनेजमेंटमधील टेक्नॉलॉजी डोमेनमधील अभ्यासक्रम यांचा समावेश आहे. अशा विविध अभ्यासक्रमांचा प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी राज्यपालांच्या हस्ते विद्यापीठाच्या बोधचिन्हाचेही अनावरण करण्यात आले. राज्यपाल श्री. कोश्यारी म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात कौशल्य विकासासाठी स्वतंत्र मंत्रालयाची सुरुवात झाली. महाराष्ट्र शासनानेही कौशल्य विकासाच्या कामात चांगली आघाडी घेतली आहे.

कौशल्य विद्यापीठाच्या माध्यमातून आता युवकांसाठी एक नवे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. हे विद्यापीठ राज्यातील कौशल्य विकासाच्या चळवळीला नवा आयाम प्राप्त करुन देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**येत्या ६ महिन्यात ग्रामीण भागात १ हजार कौशल्य केंद्र**

सुरु करणार – कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा

विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांचा शुभारंभ होत आहे. लवकरच याच्या इमारतीच्या बांधकामाचे भूमीपूजन केले जाईल आणि २०२४ पूर्वी नव्या इमारतीत विद्यापीठाचे कामकाज आणि अभ्यासक्रम सुरु होतील. विद्यापाठातील अभ्यासक्रम मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषेत शिकविण्यात येतील. राज्यात येत्या वर्षभरात ५ लाख युवकांना रोजगार देण्यात येईल. त्यादृष्टीने कौशल्य विकास विभागामार्फत व्यापक कार्यवाही करण्यात येत असल्याचे मंत्री श्री. लोढा यांनी सांगितले. कौशल्य विद्यापीठ हे शहर केंद्रीत राहणार नाही, ग्रामीण भागातही विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांना चालना देण्यात येईल. त्याचबरोबर येत्या सहा महिन्यांत राज्यातील ग्रामीण भागात १ हजार कौशल्य केंद्र उभारण्यात येतील.

या कामामध्ये राज्यातील उद्योगांनीही सहकार्य करावे, त्यांच्या उद्योगाला आवश्यक असलेल्या कौशल्यांचे प्रशिक्षण देणारी कौशल्य केंद्रे उभी करावीत, यासाठी राज्य शासनामार्फत उद्योगांना संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, असेही मंत्री श्री. लोढा यांनी सांगितले. नोबेल पुरस्कार विजेते शास्त्रज्ञ रिचर्ड जे. रॉबर्टस् यांनी यावेळी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, जीवनामध्ये मार्गदर्शकाची (Mentor) भूमिका अत्यंत महत्वाची असते. एक चांगला मार्गदर्शक हा विचार करायला तसेच सत्याचा आदर करायला शिकवतो. अपयश हा सर्वोत्तम शिक्षक आहे. अपयशाचे तसेच त्याच्या कारणांचे विश्लेषण करा आणि अपयशातून शिका, असे आवाहन त्यांनी केले. कुलगुरु डॉ. पालकर यांनी सादरीकरणाद्वारे विद्यापीठाच्या भावी वाटचालीची माहिती दिली. विद्यापीठ मुंबई केंद्रीत न ठेवता राज्यातील सहा भागांमध्ये त्याचा विस्तार करण्यात येईल. त्याचबरोबर येत्या ४ वर्षात २ लाखांहून अधिक रोजगार निर्मितीसाठी विद्यापीठामार्फत कौशल्य विकासाचे विविध अभ्यासक्रम राबविण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. विद्यापीठाचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी विक्रमसिंह यादव यांनी आभार प्रदर्शन केले.

# संताची भूमी झाली... तमासखोरांची नगरी

महाराष्ट्र ही कृषी व ऋषींची भूमी म्हणून ओळखल्या जात, या मातीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगेबाबा, गुलाबराव महाराज यांची ही जन्मभूमी. ग्रामगीताचार्य तुकाराम दादांची, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची, महात्मा फुलेंची , शाहू महाराजांची कर्मभूमी, महानुभाव महंतांची काशी, रुक्मिणीचे माहेर कौंडण्यपूर, अशा विविध सुसंस्कृतिने नटलेल्या महाराष्ट्राची ओळख संपूर्ण देशात आहे. परंतु काही वर्षापासून महाराष्ट्रातील काही जिल्ह्याला तमासखोरांचे गालबोट लागले. फार पूर्वी च्या काळात शेतीत उत्पादन झालेल्या शेतमालाचे खळे, दरोडेखोर शेतात येऊन तुटायचे. खळे लुटण्यासाठी मारामारी, लढाया व्हायच्या आणि त्याच दरोडेखोरीतून सरदारी व राजे शाही जन्माला आली. शेतमालाचा हिस्सा लुटूनच राजाची वतनदारी सुरू झाली. शेतीतून तयार झालेल्या धान्याच्या पुंजीवर, राजा-राजाच्या आप-आपसात लढाया सुरू झाल्या. तसाच प्रकार आता शेतकरी, मजुराच्या कष्टाची तिजोरी मुंबई, दिल्लीत, (विधानसभा व संसदच्या रूपाने) जमा व्हायला लागली आणि या तिजोरीवर सर्व दरोडेखोर आता तुटून पडायला लागले. अमरावती जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण राज्यात सुध्दा शेतकरी नेते आहेत का? याचीच आता आम्हाला लाज वाटायला लागली. मंत्रिमंडळाच्या शर्यतीत असणारे हे दोघेही ढोंगी व नाटकी,तमासखोर अपक्ष आमदार,आहेत. यांना फक्त सत्तेच देणं घेणं आहे. यांनी तर सत्तेत राहूनच शेतकऱ्यांचे जीव घेतले. सत्तेतल्या राजकीय पक्षांना पाठिंबा देऊन शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडवील्या?. मोघे शेतकरी नेते कसे झाले? फुकटच्या बाता मारणारे, व जनतेसाठी राजीनामा देणारे कॅबिनेट मंत्री होण्यासाठी तडफडत नसतात.हे तर जनतेसाठी खिशात राजीनामा घेऊन फिरणारे आता मंत्रिपदासाठी लोभी असल्याचे ते स्वतःच सांगतात. आणि मंत्रीपद मिळण्यासाठी जीवाचा आकांत करतात आणि मंत्री पद मिळण्यासाठी राजकीय पक्षांचे पुन्हा दरवाजे ठोठावने चालू झाले. मंत्रीपद मिळाले नाही तर सरकार पाडण्याची भाषा बोलतात. सरकारच्या तिजोरीला हजारो कोटी रुपयांचा चुना लावायला निघालेले हे समाजकारणी कसे? आता समाजकारण नव्हे तर राजकारणाचे लाचार म्हणून जगायला लागले. तर गुहाटीला जाण्याचे कारण काय होते? काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, बीजेपी च्या सोबत आतापर्यत राहून संसार थाटला. मी नाही त्यातली, कडी लावा आतली हे धंदे आता या अपक्ष आमदारनी बंद करावे.

अपक्ष आमदार म्हणजे सर्व राजकीय पक्षाची मलाई खाण्यासाठी, व जनतेला बेवकू बनवीणारा मोकळा सांड असतो. हे आता नुकत्याच झालेल्या मागील निवडणुकीतून सप्रमाण सिद्ध झालेले आहे. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यसभेचे सदस्यत्व, विधान परिषदेसाठी केलेले मतदान, अपक्ष आमदारांनी निस्वार्थीपणाने फुकट केल्याचे अजून पर्यंत ऐकले नाही. या मतदानामागे यांचे स्वार्थ खूप दडलेले होते. हे सर्व संपूर्ण महाराष्ट्राला माहित आहे. कोणतीही गोष्ट लपून राहत नाही. सरकारी तिजोऱ्या चोरण्याचे कुठेही पुरावे मिळत नसतात, ही बाब फक्त जनता समजून घेते व ऐकत असते, जगातल्या एखाद्या तरी चोरा जवळ कधी तरी चोरलेल्या वस्तूच्या, पावत्या सापडल्या काय? असे पैशाने माजलेल्या सांडांना आता आवर घालण्याची वेळ, जनतेवर आलेली आहे. यांना सुद्धा आता राष्ट्रवादी पक्षासारखीच सत्तेतून पैसा व पैशातून सत्ता दिसत आहे. कोणतेही आमदार जनतेवर उपकार करत नाही, तर सत्तेत असताना सत्तेतून जनतेचे काम करून देणे हे त्याचे आद्य कर्तव्य आहे. व तहसीलदार हे आमदाराचे व कलेक्टर हे पालकमंत्र्याचे हे झ.. असतात. व सत्तेतले आमदारांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चे काढणे हा अतिशय विचित्र धंदा आहे. घटनेद्वारे या देशाचा आमदार, खासदार हाच सत्ताधारी असताना, कलेक्टर या नौकराला निवेदन देण्यासाठी मोर्चा काढतो. यामागे आपल्या दुकानात किती माल आहे, हे तपासण्याचे फक्त हे नाममात्र शडयंत्र आहे. आपलं स्वतःचं दुकान चालविण्यासाठी ही चिल्लर शाही वापरल्या जाते. हिरव्या गवतात लपून बसलेले शासन तिजोरीवरचे हे दुतोंडी साप आता बाहेर पडत आहेत. सत्तेतल्या पैशाची मस्ती आलेली पाहून आता तरुणांना सुद्धा आमदार खासदार व्हावे अशी ईर्षा तयार झाली आहे. शासन तिजोरी लुटणारा दरोडेखोरांची, सत्तेतली भांडणे प्रत्येक जिल्ह्याला काही नवीन नाहीत. आता रवी राणांचे व (सुलभाताई गट ,प्रवीण पोटे पाटील, आनंदराव अडसूळ, हनुमान चालीसा चा उद्धव ठाकरे, अन कॅबिनेट मंत्री पदासाठी) बच्चू कडू, यांचे राजकीय वाद अगोदरही जनतेने पाहिलेले आहे. ही तर फक्त जिल्ह्याच्या राजकारणाच्या वर्चस्वाची लढाई खेळल्या जात आहे, ही काही नवीन बाब नाही, परंतु सामान्य माणसांनी या चमचेगिरीत लक्ष देण्याची काही आवश्यकता काय?. हे सर्व सत्तेतल्या लुटारूंची भांडणे आहेत. आज संपूर्ण महाराष्ट्र राज्य ओल्या दुष्काळाने होरपळून निघत असताना, त्याची ना शासनाला चिंता, ना कोणाच्या घरी व कोणा गरीबाच्या दिवाळीची काही इतरांना फिकर राहिली नाही. हे लुटारु एकमेकांच्या उरावर बसतील तर जनतेने लक्ष देण्याची गरज काय? माजलेल्या सांडाच्या कुस्त्या जनतेने फक्त बघावे, यात जनतेचे हितच काय? मग या वादात जास्त नाद खुबसूरत राहणे नक्कीच धोक्याचे वाटते? या अपक्ष आमदारांनी ,अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना,शेतमजुरांना आतापर्यत बेवकूफ बनविले. जे सरकार शेतकरी विरोधी कायदे वापरतात, व शेतकऱ्यांचे आत्महत्या घडवितात त्यांना यां दोघानी पाठिंबे दिले आहे. तर अमरावती जिल्ह्यातील एक खासदार व चार अपक्ष आमदार व काँग्रेसचे आमदार सुद्धा शेतकरी विरोधी आहेत. यांना सत्तेतून हाकला, असाच खेळ संपूर्ण महाराष्ट्रात चालू आहे. हिंदूंचं नाव घेऊन पोटाची खळगी भरत नाही, तर त्यासाठी पोटाची खळगी भरण्यासाठी बेरोजगारी काढण्यासाठी मोठमोठी कारखानदारी उभी करावी लागते. या लुटारू सत्ताधीशांच्या मागे, एलसीबी, शासनाने E.D, सी.आय.डी. तपासण्या लावाव्या. हे मिट्टू सारखे बोलतील व आपोआप यांचे भांडण मीटतील व यांचे काळे गोरख धंदे, व लपविलेल्या सर्व प्रॉपर्टी बाहेर येतील. या अपक्ष दोघांही आमदाराला संपूर्ण महाराष्ट्र, सौदेबाज नाटकी व दोघेही राजकारणातील दलाल आहेत, म्हणून संपूर्ण महाराष्ट्र ओळखतो आहे. यांनी गेल्या कित्येक वर्षापासून विधानसभेचे प्रतिनिधित्व करून अमरावती जिल्हा शेतकरी आत्महत्तेत अग्रेसर ठेवला. अमरावती जिल्ह्यातील शेतकरी संघटना संपवण्याचे काम या दोघांनी केले. राष्ट्रसंतांचे तुकडोजी महाराजांचे, गाडगे बाबांचे फोटो लाऊन, संताची नावे घेऊन व विधान भवनात ढोंगी नाटके केली, व घरात बसून सौदी बाजी केली.संपूर्ण जिल्ह्यातील जनतेला बेवकूफ बनविले. आतापर्यत शेतकऱ्यांना योग्य रस्ता दाखवण्याचे काम फक्त शेतकरी संघटनेने संपूर्ण महाराष्ट्रात केले, हे जर स्वतःला शेतकरी नेते समजतात, तर शेतकरी संघटनेचा बिल्ला छातीवर लावण्याची हिंमत यांनी जनतेसमोर दाखवावी व शेतकरी संघटनेत सामील व्हावे. शासन तिजोरी लुटण्यासाठी यांनी राजकीय पक्ष स्थापन केले आहे. हे शेतकऱ्यांचे कैवारी नाहीत तर फक्त शासन तिजोरीचे लुटारु आहेत. शेतकरी व शेतमजुरांचे हिताचे कायदे तयार केल्याशिवाय शेतकरी व शेतमजुरांना सुख, समृद्धी, व आनंद मिळू शकत नाही. शेतकऱ्यांना आर्थिक स्वातंत्र्य सुद्धा मिळू शकत नाही. हे दोघे ही नेते जनतेला बेवकुब बनविण्याचे फंडे वापरत आहेत. शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते गेल्या चाळीस वर्षापासून आपल्या रक्ताचे पाणी करत आहेत. आपल्या छातीवर बिल्ला लावून आपल्या प्रपंचाची राख रांगोळी करीत आहेत.

राजकीय नेत्याच्या,डोक्यावर, उरावर नेट पडला की, सर्व सत्ताधीश एक होतात, हा तर आजचा राजकारणाचा इतिहास आहे? हे संपूर्ण महाराष्ट्राच नाही तर देश हे संपूर्ण देश तमाशे बघत आहे, या अपक्ष आमदाराच्या, दोघांच्या भांडणात सुद्धा मोठे राजकारणी हस्तक्षेप करून हे मिटवणार आहेत. यात काही तीळमात्र शंका नाही, या भांडणाची पालेमुळे हे मुंबई, दिल्लीत पुण्यात असतात. फक्त समाजाला बेवकूब बनवण्याचे हे कटकारस्थान आहे. चोर तर चोर वरून शिरजोर असे हे फंडे आहेत. शेतकरी शेतमजूराना संपविण्याचे हे सर्व राजकीय षडयंत्र आहेत. जनतेला चुवत्या बनवून शासन तिजोरी लुटायची हा यांचा आता गोरख धंदा झाला आहे. त्यासाठी यांना फक्त मंत्रिपद हवी आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना व बीजेपी हे चारही राजकीय पक्ष सत्तेतून हाकलले तरच शेतकऱ्यांना व शेतमजुरांना आर्थिक स्वातंत्र्य मिळेल. नाहीतर वर्षानुवर्ष पुन्हा तुम्ही याच गढूळ डबक्यात फसलेले राहणार आहात? फक्त एकदा शेतकरी संघटनेच्या हाती महाराष्ट्राचे संपूर्ण राज्य द्या आणि राज्यातील बदल घडवून संतांची भूमी स्वच्छ करा. शेतकरी संघटनेतून जर आपणास बदल दिसला नाही तर तुम्ही पुन्हा जुन्या राजकीय पक्षांना नक्कीच जवळ करा, पण फक्त एकदा संपूर्ण महाराष्ट्रात जनतेने शेतकरी संघटनेचा झेंडा फडकवून आपली हिंमत दाखवा. तरच महाराष्ट्रातील जनतेची छाती ५६ इंच आहे असे वाटेल? नाहीतर जनता सुद्धा या व्यवस्थेला लाचार झाली असेच आता नम्र पने जाहीर करावे लागेल. हीच जनतेकडून अपेक्षा.



**लेखक : धनंजय पाटील काकडे,**
**कार्याध्यक्ष, शेतकरी संघटना समन्वय समिती,**
**महाराष्ट्र (९८९०३६८०५८)**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

## अवैध दारू व जुगारावर भादा पोलिसांची धाड



औसा : भादा पोलिस ठाणे हाद्दीतील मौजे आशीव तांडा येथे अवैध गावठी दारू विक्री होत आसल्याची गुप्त माहीती भादा पोलिस ठाण्याचे सपोनि विलास नवले यांना मिळाली होती. मिळालेल्या माहीती वरून पोलिसांचे एक पथक तयार करून टाकलेल्या धाडीत गावठी दारू विक्रेता विलास ज्ञानदेव जाधव यांच्या ताब्यातील १५० लिटर गावठी दारूचे रसायन व त्यासाठी वापरणारा ५० किलो गुळ असा एकूण १२ हजार रू.चा मुद्देमाल जप्त केला. तसेच दीपक ज्ञानु चव्हान, रा. आशीव, याचेकडे ५० लिटर गावठी दारूचे मिश्रण रू.२ हजार ५०० रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यांचेवर गु.र.न. १७३/२२ क.६५ दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर मौजे आशीव गावात पैशावर स्वतःचे फायद्याकरतश्र पत्त्यावर तिर्रट नावाचा जुगार खेळत आणी खेळवत आसताना आरोपी नामे दिपक लक्ष्मण कांबळे, विक्रम कैलास रांसिंगे, भय्यासाहेब गोरख आयवळे, सोनू कल्याण गवळी, बालाजी किसन चांदूप, बबलू बाळू गायकवाड असे मिळून आले. त्यांचे ताब्यातून एकून रू.१९ हजार ६००रूपयाचा मुद्देमाल जप्त करून, त्यांचेवर गु.र. न.१७१/२२ क.१२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे.

## भाजपा शिंदे गटासोबत आगामी महापालिका निवडणुका लढवणार – चंद्रशेखर बावनकुळे

**भिवंडी/अभिजित हिरे**

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यभर भारतीय जनता पक्ष नजीकच्या काळात होणाऱ्या महानगरपालिका निवडणुका एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बाळासाहेबांची शिवसेना गटा सोबत युती करून निवडणुका लढविणार असल्याची घोषणा भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.ते भिवंडी येथील पक्ष आढावा दौऱ्या प्रसंगी आयोजित वार्तालाप कार्यक्रमात बोलत होते.या प्रसंगी माधवी नाईक, भाजपा शहराध्यक्ष संतोष शेट्टी,आमदार महेश चौघुले, आरपीआय शहराध्यक्ष महेंद्र गायकवाड, सुमित पाटील उपस्थित होते. महाराष्ट्रातील शिंदे फडणवीस सरकार बुलेट ट्रेन च्या स्पीडने विकास करणारेअसून भिवंडी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मागील युतीकाळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोट्यवधी रुपयांचा निधी दिला. मध्यंतरी त्यामध्ये खंड पडला असला तरी येत्या काळात भरीव विकास निधी भिवंडी शहराला मिळवून देण्यासाठी आपण व्यक्तिशः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




यांच्या सोबत चर्चा करणार असल्याची माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. दिवसभर आयोजित भरगच्च कार्यक्रमात चंद्रशेखर बावनकुळे हे भाजपा कोअर कमिटी सोबतच बुद्धिजीवी व विविध समाज घटकां सोबत चर्चा करणार असून भाजपा भिवंडी शहरात अधिक बळकट करण्यासाठी संघटनात्मक बैठकीं सोबत बूथ कमिटी, सोशल मीडिया कमिटी पदाधिकारी यांच्या सोबत बैठकां मध्ये मार्गदर्शन करणार आहेत. या संघटनात्मक कार्या सोबत केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या घरी धन्यवाद मोदीजी उपक्रमा अंतर्गत तर नवमतदार असलेल्या युवा यांच्या घरी भेट देऊन त्यांचे अनुभव एकूण घेणार आहेत. तर शहरातील विविध भागात सुरू होणाऱ्या युवा वारीयर्स शाखा उदघाटन,व्यायामशाळा भूमिपूजन चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शुभहस्ते होऊन सायंकाळी विविध सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमांना हजेरी लावणार असल्याची माहिती भाजपा शहराध्यक्ष संतोष शेट्टी यांनी दिली आहे.

## पी. जे. हायस्कुल येथील योग शिबिराला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद



**वाडा/प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे वाडा शहर शाखेच्या वतीने मंगळवारी (दि. १ नोव्हेंबर) वाडा शहरातील पी.जे.हायस्कुलच्या पटांगणात नागरिकांसाठी योग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी साडे सहा ते आठ वाजेच्या दरम्यान असलेल्या शिबिरास नागरिकांनी उत्तम प्रतिसाद देत शिबिरात सहभाग घेतला. योग प्रशिक्षक जगन्नाथ भोईर व सुरेंद्रनाथ दुसाने यांनी मार्गदर्शन केले. हे शिबीर १ नोव्हेंबर पासून ४ नोव्हेंबर पर्यत रोज सकाळी सहा ते आठ वाजेपर्यंत आयोजित केले होते. या योग शिबिरात पोलीस निरीक्षक दशरथ पाटील, शिवसेनेचे पालघर जिल्हा सहसंपर्क प्रमुख निलेश गंधे, पत्रकार युवराज ठाकरे तालुका प्रमुख उमेश पठारे, तालुका उपप्रमुख तुषार यादव, निलेश पाटील, प्रणय गंधे, वर्षा गोळे, प्रकाश केणे यांच्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या प्रमाणात महिला उपस्थित होत्या.

## महात्मा बसवेश्वर कुस्ती प्रशिक्षण केंद्रातील तीन खेळाडूंची महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी निवड



**लातूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद व लातूर जिल्हा कुस्तीगीर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कै.पैलवान रावसाहेब मुळे यांच्या स्मरणार्थ लातूर जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कुस्ती स्पर्धा अंकुली ता.जि.लातूर येथे दि.२७ आणि ऑक्टोबर २०२२ रोजी घेण्यात आल्या. या स्पर्धेत महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील कुमार महाराष्ट्र केसरीसाठी ५५ किलो बाळासाहेब जमादार ११वी कला, प्रथम गणेश धायगुडे ८१ किलो प्रथम, शंकर कतलाकुटे, १२ वी कला ७१ किलो द्वितीय तसेच महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी ५७ किलो माती गटात आकाश गड्डे प्रथम ६५ किलो महेश तातपुरे प्रथम, ७९ किलो विष्णू तातपूरे प्रथम, ६१ किलो प्रणव जाधव द्वितीय, ७९ किलो, प्रदीप गोरे द्वितीय व ८६ किलो तुकाराम महानवर द्वितीय आले असून त्यांची निवड झाली आहे.

या सर्व विजयी खेळाडूंचे महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे जेष्ठ संचालक शिवशंकर वैजनाथप्पा खानापुरे आणि ॲड.श्रीकांत तमन्नाप्पा उटगे यांच्या हस्ते शाल व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड, उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य बालाजी जाधव, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, डॉ.दीपक चाटे, डॉ.रत्नाकर बेडगे, डॉ.आनंद शेवाळे, डॉ.शिवप्रसाद डोंगरे, प्रा.आशिष क्षीरसागर, डॉ.कैलास पाळणे, विष्णू तातपुरे, संदीप मोरे आदीची उपस्थिती होती. या सर्व विजय खेळाडूंना क्रीडा विभाग प्रमुख डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, डॉ.गुणवंत बिरादार आणि प्रा.आशिष क्षीरसागर यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळत आहे. या सर्व विजय खेळाडूंचे श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव कोषाध्यक्ष कार्यकारी संचालक आणि सर्व संचालक, शाखा समन्वयक, विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

## जवळग्यात माकडाची दहशत कायम; वनविभागाचा पिंजरा माकडाच्या प्रतिक्षेत



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील जवळगा येथे छोटासा माकड छोट्याशां मुलांना चावा घेत असल्याने गावात मोठ्या प्रमाणावर दहशत निर्माण झाली आहे. परिणामी वनविभागाचे कर्मचारी दाखल होऊन बुधवार दि.२ नोव्हेंबर रोजी माकडाला पकडण्यासाठी मोठा पिंजरा लावण्यात आला आहे. जवळग्यात गेल्या आठवाडा भरापासून जवळपास १० ते १५ लहान मुलांना माकडाने चावा घेऊन जखमी केले आहे. जखमी बालकांना ठिकठिकाणी औषधोपचार करण्यात आले आहे. मात्र सद्यस्थितीत जवळग्यात माकडाची मोठ्या प्रमाणावर नागरिकात भिती निर्माण झाली आहे. नागरिक आपली लहान मुले घराबाहेर निघणार नाहीत याची काळजी घेत आहेत. तर वनविभागाचे कर्मचारी माकडावर पाळत ठेवून आहेत. जवळगा येथे जुन्या पडकुट वाड्यात माकडांचा नेहमी वावर असतो. यामुळे या जुन्या पडकुट वाडा परिसरात वनविभागाच्या वतीने भलामोठा पिंजरा लावण्यात आला आहे. मात्र अद्यापही पिंजरा माकडाच्या प्रतिक्षेत असल्याने नागरिकात माकडाची दहशत कायम आहे. जवळगा येथे वनविभागाचे वनरक्षक नामदेव डिगोळे, वनपाल रघुनाथ तेलंगे, पंडित लासुने, कमलाकर फुले, नामदेव व्होन्ने, उमाकांत घोगरे यांच्यासह आदी कर्मचारी व नागरिक माकडाचा शोध घेत आहेत.

## भिवंडी तालुक्यातील शिरोळे ग्रामपंचायतीवर मनसेची एकहाती सत्ता, उपसरपंच पदावर सुध्दा मारली बाजी



**भिवंडी/अभिजित हिरे**

१६ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या भिवंडी तालुक्यातील ३१ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत शिरोळे ग्रामपंचायती वर मनसे ने एकहाती सत्ता प्रस्थापित केली असून, थेट सरपंच निवडीत वैजय मिळवील्या नंतर उपसरपंच निवडणुकीत मनसेच्या रविना मानकर यांनी शिवसेना उमेदवाराचा ६ विरुद्ध ३ मताने पराभव करीत सत्ता प्रस्थापित केली आहे.

तालुक्यातील ३१ ग्रामपंचायतिच्या निवडणूकीत दोन ग्रामपंचायतींवर मनसेने विजय संपादन केला होता. त्यामध्ये तालुक्यातील शिरोळे ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी लक्ष्मी लाथड या थेट निवडणुकीत विजयी झाल्या होत्या. त्यानंतर गुरुवारी पार पडलेल्या उपसरपंच पदाच्या निवडणुकीत मनसे तर्फे रविना मानकर तर शिवसेने कडून जयदास मते यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने निवडणूक घेण्यात आली. ज्यामध्ये रविना मानकर या विजयी झाल्या.या घोषणे नंतर मनसे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी एकाच जल्लोष साजरा केला. मनसेने ग्रामपंचायतीवर सत्ता स्थापन केल्याने या गावाचा विकास इतर ग्रामपंचायती पेक्षा अधिक होईल व नागरिकांच्या विश्वासास सरपंच उपसरपंच यांसह ग्रामपंचायती सदस्य पात्र ठरतील असा विश्वास मनसे विद्यार्थी ठाणे जिल्हा अध्यक्ष परेश चौधरी यांनी व्यक्त केला आहे. तर सरपंच व उपसरपंच यांना शुभेच्छा देण्यासाठी मनसे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष डी के मात्रे, भिवंडी लोकसभा अध्यक्ष शैलेश बिडवी,विद्यार्थी सेना महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष संतोष साळवी, मदन पाटील, संजय पाटील यांच्यासह अनेक मनसे कार्यकर्ते पदाधिकारी व शिरोळे ग्रामस्थ उपस्थित होते.

## कृषी अधिकारी वलांडे यांच्या सेवानिवृत्ती बद्दल निरोप समारंभ

**देवणी/प्रतिनिधी**



देवणी तालुका कृषी कार्यालयातील कृषी अधिकारी एस एन वलांडे हे कृषी विभागात ३९ वर्ष ५ महिने सेवा केली नियत वयोमानानुसार ३१ क्टोंबर २०२२ रोजी ते सेवानिवृत्त झाल्याबद्दल तालुका कृषी कार्यालय च्या वतीने वलांडे यांचा स्तकार करून निरोप देण्यात आले, यावेळी तालुका कृषी अधिकारी एस आर पाटील, मंडळ कृषी अधिकारी बी एम जाधव, माने अतुल, मरेवाड, पी एच रेड्डी कृषी सहाय्यक, व कर्यालयातील सर्व कर्मचारी हजर होते. यावेळी वलांडे यांना पुढील आयष्यासाठी शुभेच्छा देण्यात आले.

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीकरिता अर्ज करण्याचे सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव यांचे आवाहन

**रायगड/धर्मानंद गायकवाड**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, याकरिता शासनाच्या वतीने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. विद्यार्थ्यांकडून अर्ज केले जात असून, दि.३ नोव्हेंबरपर्यंत महाडीबीटी पोर्टलवर २ हजार ३८५ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागामार्फत प्रत्येक वर्षी अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागास प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती आणि राज्य शासनाची शिक्षण, परीक्षा शुल्क आदी योजनांचा लाभ देण्यात येतो. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी विभागाच्या पोर्टलवरून ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे. सन २०२२-२३ या वर्षाकरिता प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी ही प्रणाली आणली आहे. विद्यार्थ्यांनी विहीत वेळेत ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव यांनी केले आहे.

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरिता विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याची प्रक्रिया पहिल्या आठवड्यापासून प्रारंभ झाला असून जिल्ह्यातील २ हजार ३५५ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरले आहेत. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय विभाग तर विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागास प्रवर्गास इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत शिष्यवृत्ती देण्यात येते. अनुसूचित जाती प्रवर्गातील ५६० तर विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागास प्रवर्गाचे १ हजार ७९५ अर्ज प्राप्त झाले आहेत. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरण्यास अडचण येऊ नये, याकरिता प्रत्येक महाविद्यालयात समान संधी केंद्र स्थापन करण्यात आले आहे. या समान संधी केंद्रात एका प्राध्यापकाची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती, राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती, फ्रीशिप शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येतो. उत्पन्न व प्रवर्गावर आधारित शिष्यवृत्तीचा लाभ मिळतो. अन्य शिष्यवृत्तीसाठीही अर्ज करता येतो. महाविद्यालयांनी कार्यवाही करावयाचे वेळापत्रक: दि.१ नोव्हेंबर ते दि.१५ नोव्हेंबर २०२२ मध्ये द्वितीय, तृतीय, अंतिम वर्ष विद्यार्थ्यांचे सन २०२२-२३ वर्षाकरिता नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे व दि.२० नोव्हेंबर ते दि.३० नोव्हेंबर २०२२ मध्ये नविन प्रवेशित विद्यार्थ्यांचे अर्ज नोंदणी करून घेणे. २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती अर्ज भरण्याच्या प्रक्रियेस मागील महिन्यापासून प्रारंभ झाला आहे. जिल्ह्यातील अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागास प्रवर्गातील २३ हजार अर्ज येणे अपेक्षित असून केवळ २ हजार ३५५ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. दरम्यान विद्यार्थ्यांनी वेळेत ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव यांनी केले आहे.

## भिवंडीत युवक काँग्रेसची 'बाईल रॅली'



**भिवंडी** : काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा ७ नोव्हेंबरला महाराष्ट्रात येणार असून, त्यानिमित्त काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला असून भिवंडीत युवक काँग्रेसच्या वतीने राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रे दरम्यान युवक काँग्रेस भिवंडी शहर अध्यक्ष राहुल पाटील यांच्या नेतृत्वाखाली बाईक रॅली चे आयोजन करण्यात आले होते. भांडारी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत रॅली काढण्यात आली. यावेळी भिवंडी शहराचे माजी काँग्रेस अध्यक्ष आमदार रशिद ताहीर मोमीन, माजी खासदार सुरेश टावरे, महिला अध्यक्ष रेहाना अन्सारी, जावेद फारुकी सह युवक काँग्रेस चे शेकडो कार्यकर्ते या रॅली सहभागी झाले होते.

## वाडा मनोर महामार्गावर भीषण अपघात



वाडा : वाडा मनोर महामार्गवरील किरवली गावाच्या हद्दीत एका सुसाट कारणे दोन दुचाकींना मागून धडक दिल्याने तिघे जन जखमी झाले असून दोन्ही दुचाकी व कारचे मोठे नुकसान झाले आहे. किरवली येथील उतारावर युनिकॉर्न व स्पेंडर या गाड्यांना मनोरच्या दिशेकडून वाड्याकडे येत असणाऱ्या मार्सिडीज या कारणे मागून धडक दिल्याने युनिकॉर्न गाडी विरुद्ध दिशेला फेकली गेली तर स्पेंडर पुढे घसरत जाऊन पडली. या धडकेत युनिकॉर्न चालक हवेत फेकला गेला तर या गाडीची पेट्रोल टाकी व सीट आणि दुचाकी वेगवेगळे फेकले गेले आहेत, युनिकॉर्न चालक अक्षय महालेचा एक हाथ व एक पाय फ्रॅक्चर झाला असून त्याच्यावर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. तर स्पेंडर चालक भूषण मढवी व त्याची आई नमिता मढवी यांच्यावर वाडा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरु आहेत. मार्सिडीज चालकचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने या दोन्ही गाड्यांना धडक देऊन विजेच्या खंबाला धडक दिल्याने विजेचा खांबही वाकला आहे. दरम्यान मार्सिडीज चालक घटनास्थळावरुन पसार झाला आहे. अधिक तपास वाडा पोलीस करत आहेत.

## पालघर जिल्ह्यामध्ये २१ नोव्हेंबर रोजी महिला लोकशाही दिन

पालघर : समस्याग्रस्त व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महिलांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी म्हणजेच या महिन्याचा महिला लोकशाही दिन दि. २१ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे आयोजित करण्यात आला आहे. महिला लोकशाही दिनाचा अर्ज जिल्हाधिकारी यांना उद्देशून असावा. तसेच तालुका महिला लोकशाही दिन टोकन क्र. व तहसिलदारांच्या उत्तराची प्रत अर्ज सोबत जोडण्यात यावी. महिला लोकशाही दिनी घ्यावयाची तक्रार, अडचण किमान १५ दिवसाच्या पूर्वी अर्ज जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, कक्ष क्र. १०८, पहिला मजला, प्रशासकीय इमारत अ, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, कोळगाव रोड, पालघर येथे करावा. संपर्कासाठी ई-मेल- dwcdopalghargmail.com फोन नं.०२५२५-२५७६२२ यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुरव्यासह सादर करावे. असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पालघर यांनी केले आहे.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयामध्ये उत्कृष्ठ वादविवाद पटू शुभम मधुकर निकम यांचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी**

येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील इतिहास पदव्यूत्तर द्वितीय वर्षातील विद्यार्थी शुभम मधुकर निकम यांनी विविध वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धेमध्ये उज्वल यश संपादित केल्यामुळे प्राचार्य दालनामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे संचालक प्रा.जि.एम.धाराशिवे, स्वीकृत संचालक अशोक शरणाप्पा उपासे, उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, इतिहास विभाग प्रमुख तथा स्पर्धा समिती समन्वयक डॉ.सदाशिव दंदे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.विजयकुमार सोनी, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.संजय गवई आणि डॉ.किरण ओटले यांची उपस्थिती होती. शुभम मधुकर निकम यांनी युवा कार्यक्रम आणि खेल मंत्रालय, भारत सरकार, नेहरू युवा केंद्र, लातूर आणि राजश्री शाहू महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा युवा उत्सव २०२२ अंतर्गत आयोजित वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. तसेच र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय गेवराई जि.बीड द्वारा आयोजित शिक्षण महर्षी शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त अट्टल महाविद्यालय राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा २०२२ मध्ये त्यांनी सहभाग नोंदवून उज्वल यश संपादित केले आणि जनविकास महाविद्यालय, बनसारोळा ता.केज जि.बीड पूज्य मनोहरराव गोरे (अण्णा) मराठवाडास्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेमध्ये त्यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. यामध्ये त्यांनी स्मृतिचिन्ह, रोख रक्कम आणि सन्मानपत्र मिळविले आहे. त्यांनी प्राप्त केलेल्या या उज्वल यशाबद्दल श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, उपप्राचार्य, शाखा समन्वयक, विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पोलीस ठाण्यामध्ये येणाऱ्या नागरिकांशी सौजन्याने वागा -पोलीस महासंचालक

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यात तक्रार घेऊन येणाऱ्या नागरिकांशी सौजन्याने वागावे. प्रत्येकाची तक्रार ऐकून तक्रारींचे निराकरण करावे, असे आदेश पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांनी शुक्रवारी दिले. पुणे शिवाजीनगर पोलीस मुख्यालयातील वास्तू तसेच आवारातील पूर्व प्राथमिक प्रियदर्शिनी पब्लिक स्कूलच्या इमारतीचे नूतनीकरण करण्यात आले आहे. पोलीस महासंचालक सेठ यांच्या हस्ते नूतनीकरणाचे उद्घाटन झाले, या प्रसंगी ते बोलत होते. राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक (प्रशासन) अनुपकुमार सिंह, अतिरिक्त पोलीस महासंचालक (राज्य राखीव पोलिस दल) चिरंजीव प्रसाद, पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, सहपोलीस आयुक्त संदीप कर्णिक, अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. जालिंदर सुपेकर, राजेंद्र डहाळे, नामदेव चव्हाण, प्रियदर्शनी पब्लिक स्कूलचे कार्यकारी अधिकारी राजेंद सिंग, मुख्याध्यापक अर्पिता दीक्षित आदी या प्रसंगी उपस्थित होते.

पोलीस कायदा-सुव्यवस्था सांभाळतात. त्यांचा नागरिकांशी थेट संपर्क येतो. पोलिसांनी नागरिकांशी सौजन्याने वागावे. पोलीस ठाण्यात तक्रार घेऊन येणाऱ्या नागरिकांच्या तक्रारी नीट ऐकून घ्याव्यात. नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करणे हे पोलिसांचे काम आहे. तक्रारदाराला चांगली वागणूक देणे गरजेचे आहे,असे पोलीस महासंचालक सेठ यांनी नमूद केले. पोलीस दलातील प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियमित आरोग्य तपासणी करण्यात यावी. पोलीस वसाहतीत योग्य त्या सुविधा पुरवाव्यात. पोलीस ठाण्यांपासून जवळच्या ठिकाणी पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना निवासस्थाने उपलब्ध करून द्यावीत. गणेशोत्सवात पुणे पोलिसांनी बंदोबस्त योग्यरीत्या पार पाडला. उत्सवाच्या कालावधीत अनुचित प्रकार पडला नाही, असे त्यांनी सांगितले. पोलीस आयुक्त गुप्ता यांनी प्रास्ताविक केले. सहपोलीस आयुक्त कर्णिक यांनी आभारप्रदर्शन केले.

# धाब्यावर धाड; ५ मद्यपी आणि हॉटेल चालकाविरुद्ध गुन्हा दाखल



**सोलापूर/प्रतिनिधी**

आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई कांतीलाल उमाप, संचालक सुनील चव्हाण व विभागीय उप-आयुक्त, पुणे अनिल चासकर यांचे आदेशान्वये व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर नितीन धार्मिक व उपअधीक्षक आदित्य पवार यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २ नोव्हेंबर रोजी मिळालेल्या बातमीच्या आधारे हैद्राबाद रोडवरील परिसरातील हॉटेल मिलन येथे छापा टाकला असता सदर हॉटेलचे चालक याचेसह त्याच्या हॉटेलमध्ये अवैधरित्या दारु पिण्याकरिता बसलेल्या ५ मद्यपीं व हॉटेल चालकास अटक करुन ताब्यात घेतले होते. अटक आरोपींच्या ताब्यातून रू. १०५५/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सर्व आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६८ (अ) (ब) व ८४ नुसार गुन्हा दाखल करुन सदर गुन्हयाचे तपास अधिकारी यांनी आज दि. ३ नोव्हेंबर रोजी एक दिवसात गुन्ह्याचे आरोपपत्र न्यायालयात दाखल केले असता मा. दारूबंदी न्यायालय, सोलापूर यांनी तात्काळ निकाल देत हॉटेल चालक यास रू. २५ ,०००/- व मद्यपी ग्राहकांना प्रत्येकी रू. ५०००/- प्रमाणे असा एकूण ५०,०००/- दंड ठोठावला आहे. सदरची कारवाई निरीक्षक संभाजी फ़डतरे, सदानंद मस्करे, सुनील कदम , दुय्यम निरीक्षक उषाकिरण मिसाळ, पुष्पराज देशमुख, सहायक दुय्यम निरीक्षक बिराजदार व जवान चेतन व्हनगुंटी, गजानन ढब्बे, कु.प्रियंका कुटे यांनी पार पाडली असून सदर गुन्ह्याची फिर्याद एस. एफ बेगमपुरे यांनी दिली असुन तपास उषाकिरण मिसाळ यांनी पूर्ण केला.

पान १ वरून...

## उसन्या पैशावरून वाद झाला...

याच्याशी रहेमान याची मैत्री जुळली होती. तो ही त्याचेबरोबर फिरत होता. त्याच्या बरोबर खायला प्यायला बसत होता. ते सर्व जण एकमेकांचे जवळचे मित्र बनले. आपला मुलगा वाईट मित्रांच्या संगतीला लागल्याचे पाहून रहेमान याच्या आई-वडिलांनी त्याला चांगले वाग. काही तरी कामधंदा कर.असे सांगितले. पण तो दिवसे दिवस तो त्याच्या नादाला लागून बिघडत चालला होता. घरच्या तगादयाने रहेमानने राहत्या घराशेजारीच पानटपरी टाकण्याचा विचार केला. कोणताही व्यवसाय करायचा म्हटले की त्याला भांडवल हे लागतेच ते भांडवलच रहेमान याच्या जवळ नव्हते. पण त्याने पानटपरी टाकण्याचा निर्णय घेतला असल्याने कुठून तरी पैसा उभा करायचा आणि व्यवसाय करायचा असे त्याने ठरविले. यश गागडे, आसिफ चिक्कोडे साहिल माछरे हे तिघे ही पोलीस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार होते. त्याच्याशी रहेमान याची मैत्री असल्याने त्याला सहसा कुणी पैसे देत नव्हते. तरी ही त्याने थोडी फार पैशाची व्यवस्था केली. पानटपरीसाठी त्याला आणखीन थोडी पैशाची गरज होती. पानटपरी साठी त्याने यश गागडे याच्याकडून पैसे उधारी उसणवारी घेतली.

रहेमान याने पानटपरी सुरू करून एक दीड वर्ष झाले तरी तो यशचे पैसे काही परत देत नव्हता.यश त्याच्याकडे पैसे मागून दमला होता. यातून त्या दोघाची दोन तीन वेळा भांडणे झाली होती. रहेमान याला यश याने मारहाण केली. यातूनच त्या दोघात वैरवाद ही निर्माण झाला होता. ते दोघे ही अमोरा समोर आले तरी एकमेकाकडे खुन्नसी नजरेने बघत होते. रहेमान याला ते तिघे ही सराईत गुन्हेगार आहेत याची चांगली माहिती होती. त्यांच्या सगळ्या नाडया त्याला माहित होत्या. ते कुठे अडकून आहेत याची ही त्याला माहिती होती. ते आपले काहीच वाकडे करू शकत नाहीत याची त्याला खात्री होती म्हणून तो त्याचे पैसे दयायला टाळाटाळ करीत होता. रहेमान याने ही यश आणि त्याच्या मित्रांना बघून घेण्याची भाषा केली होती. काही करून ते त्याला बोलवायला आले तरी तो त्याचेबरोबर जात नव्हता. खरे तर त्याने एक प्रकारे त्याचा नाद सोडला होता. तो आपल्याबरोबर फिरत नाही आणि आपले पैसे ही परत देत नाही याचा राग यश गागडे याला आला होता. त्यामुळे त्याचेबर तो चिडून होता. काही तरी करून यातून मार्ग काढायचा याचा विचार त्याने केला. पण रहेमान हा काही त्याला दाद देत नव्हता. गेल्या महिन्याभरापूर्वी यश आणि त्याच्या मित्रांनी रहेमान याला धमकी दिली तु जर पैसे परत दिला नाहीस तर तुला बघूनच घेतो. तरी ही रहेमान याने यश आणि त्याच्या मित्रांना दाद दिली नाही. हल्ली तो आपल्या बरोबर फिरत नाही, आपल्या गॅंगमध्ये राहत नाही याचा ही राग यशला आला होता. रहेमान याला कायमचा संपवला पाहिजे असा तिघांनी विचार केला. त्यासाठी त्यांनी प्लॅन ही केला. हल्ली रहेमान हा आपण भले आणि आपले काम भले असे वागत होता. त्याला कुणाशी काही देणे घेणे नव्हते. काय वाद होता आर्थिक वाद होता तो फक्त यश शी होता. त्याचा पानटपरीचा धंदा हा जेम तेम चालत होता. खणी जवळील रस्त्यावर आता वर्दळ ही वाढली होती. मात्र ग्रिहाईक काही होत नव्हते. त्यामुळे तो ही थोडा त्रस्तच होता.त्यात यशचा तगादा वाढला होता. गुरूवार दि.१ ऑक्टोंबर रोजी रात्री ९ वाजता रहेमान हा आपली पानटपरी बंद करून आपल्या दुसऱ्या मित्रासोबत डेक्कन जवळील एका हॉटेलात जेवायला गेला. जेवण करून तो परत आपल्या पानटपरीजवळ येवून मित्रासोबत थांबला होता. त्यावेळी भागातील लाईट ही गेली होती. त्यामुळे परिसरात सर्वत्र अंधार होता. रात्रीचे ११ वाजत आले होते. तेवढयात दोन दुचाकीवरून चार जण त्याचेजवळ आले. त्यात यश ही होता. त्याचेबरोबर साहिल माछरे, आणि आसिफ चिक्कोडे हे होते. त्यांनी रहेमान याला दादागिरी करत मागील भांडणाचा जाब विचारला. तु एक तर पैसे ही परत देत नाहीस. उलट आम्हालाच दादागिरी करतोस असे म्हणत आसिफने त्याची गळफेट धरली. त्या तिघांनी मागील भांडण उकरून काढत रहेमानला लाथा बुक्कांनी मारहाण करायला सुरूवात केली. रहेमानबरोबर असणारे इतर दोघांनी येथे काही तरी विपरीत घडणार हे ओळखून तेथून पळ काढला. यश गागडे याने रहेमानला खाली पाडले होते. त्याचा राग अनावर झाला होता. त्यातच त्याने आपल्याबरोबर आणलेला कोयता काढला आणि त्या कोयत्याने रहेमान याच्या मानेवर तसेच डोक्यावर जबर वार केले. त्यासरशी रहेमान याच्या डोक्यातून आणि मानेतून रक्ताची चिळकांडी उडाली तो ओरडत असतानाच त्याने परत ८ते ९ वार केले. तो रक्ताच्या थारोळ्यात निपचिप पडला. त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याचा आपल्या हातून खून झाला आहे हे बघून त्या तिघांनी तेथून आपअपाल्या दुचाकीवरून पळ काढला. काही क्षणातच ही घटना भागातील लोकांना समजल्यावर त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यात रहेमान याच्या आई वडिलांचा ही समावेश होता. काही लोकांनी तातडीने हालचाल करीत घटनास्थळी पडलेल्या रहेमान याला तातडीने उपचारासाठी आयजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्याला तपासून त्याचा उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे घोषीत केले. या घटनेची माहिती शहापूर पोलीसांना समजातच त्यांनी तातडीने हालचाल करीत घटनास्थळ गाठून घटनेचा पंचनामा केला. घटनास्थळी अप्पर पोलीस अधिक्षक जयश्री गायकवाड, प्रभारी पोलीस उपाधिक्षक रामेश्वर वैंजने, शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी भेट देवून परिस्थीची पाहणी करून घटनेची माहिती घेतली. मयत रहेमान नदाफ याच्या वडिलांनी दिलेल्या माहितीवरून पोलीसांना ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे याचा अंदाज आला. या घटनेतील संशयीत आरोपी पळून गेले असल्याने त्याच्या शोधासाठी पोलीसांची तीन पथके तयार करण्यात आली. या घटनेनंतर संशयीत आरोपी हे नृसिंहवाडीकडे गेल्याची माहिती पोलीसांना मिळाल्यावर पोलीसांच्या एका पथकाला त्याचा सुगावा लागला. त्यांनी नृसिंहवाडीत एके ठिकाणी सापळा लावून यश गागड, आसिफ चिक्कोडी आणि साहिल माछरे याच्या मुसक्या आवळल्या.ही घटना शहापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असल्याने या घटनेची नोंद शहापूर पोलीसात झाली होती. म्हणून या तिघांना ताब्यात घेऊन शहापूर पोलीस ठाण्यात आणून त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबुल करून रहेमान नदाफ याचा खून कोणत्या कारणासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. मयत रहेमान नदाफ याच्या वडिल मलिक नदाफ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शहापूर पोलीसांनी रहेमान मलिक नदाफ (वय २०) याच्या खून प्रकरणी यश गागडे (वय २२) आसिफ चिक्कोडे (वय २०) साहिल माछरे (वय २१) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्यांना इचलकरंजी येथील प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने त्यांना ७ नोव्हेंबर पर्यत पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला कोयता व दोन दुचाकी जप्त केल्या. या गुन्हयात आणखी काही जणांचा समावेश आहे का? याचा पोलीस तपास करीत आहेत.या घटनेचा पुढील तपास शहापूर पोलीस स्टेशनचे स.पो.नि.अभिजीत पाटील हे करीत आहेत. गॅंगवॉरने लहान मोठया शहरातून डोके वर काढले आहे त्यातूनच क्षुल्लक कारणातून वाद उकरून काढून एखादयाची गेम केली जाते हेच या घटनेवरून दिसून येते.

## 'हनी ट्रॅप'चे जाळे डॉक्टरला नाही ...

होती. ती महिला डॉक्टरकडे वेळोवेळी वैद्यकीय तपासणीकामी येत होती. १५ ऑक्टोबर २०२२ शनिवारचा तो दिवस होता. सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास डॉक्टर महोदय त्यांच्या कोर्ट परिसरातील दवाखान्यात हजर होते. दवाखान्यात त्यावेळी फारसा स्टाफ देखील हजर नव्हता. त्याचवेळी एका ओळखीच्या तरुणीचा डॉक्टरांना फोन आला. मी तुम्हाला अर्ध्या तासात भेटायला येते असा तिने डॉक्टरांना फोनवर निरोप दिला. अर्धा तास झाला तरी देखील ती तरुणी त्यांना भेटण्यासाठी आली नाही. मात्र तिच्याऐवजी दुसरीच एक महिला व एक तरुणी अशा दोघी जणी त्यांना भेटण्यासाठी आल्या. अर्ध्या तासापुर्वी तुम्हाला फोन करणाऱ्या तरुणीने आम्हाला पाठवले आहे असे त्या महिलेने डॉक्टरांना सांगितले. दवाखान्यात डॉक्टरांना भेटण्यासाठी आलेल्या त्या महिलेने यापुर्वी त्या डॉक्टरांकडून वैद्यकीय उपचार घेतलेला होता. आपले पोट दुखत असल्याचे तिने यावेळी डॉक्टरांना यावेळी सांगितले. तुम्ही आणलेला रिपोर्ट जुना असून नवा रिपोर्ट आणावा लागेल त्यानंतरच तुमचा पुढील इलाज होईल असे डॉक्टरांनी त्या महिलेला म्हटले. त्या महिलेसोबत आलेल्या तरुणीने आपल्याला लघवीच्या जागी इन्फेक्शन झाले असल्याचे डॉक्टरांना सांगितले. आपल्याजवळ असलेल्या सॅंपल टॅबलेट मधील काही गोळ्या डॉक्टरांनी त्या तरुणीला दिल्या. या गोळ्या घेतल्यानंतर बरे वाटेल असे सांगून त्या गोळ्या घेण्यास डॉक्टरांनी त्या तरुणीला सांगितले. एवढा वार्तालाप झाल्यानंतर दोघी जणी तेथून जाण्यासाठी निघाल्या. मात्र काही वेळातच ती तरुणी पुन्हा डॉक्टरांकडे आली. मी सध्या रिकामीच आहे. काही काम असल्यास मला कधीही सांगा असे त्या तरुणीने आपल्या विशीष्ट देहबोलीचा वापर करुन डॉक्टरांना म्हटले. सोबतच तिने आपला मोबाईल क्रमांक देखील डॉक्टरांना दिला. तिची सुमधुर वाणी आणि विशीष्ट देहबोली डॉक्टरांना बरेच काही सांगून गेली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी १६ ऑक्टोबरच्या सकाळी अकरा वाजता त्या तरुणीने डॉक्टरांना फोन करुन काही काम आहे का अशी सांकेतीक विचारणा केली. मी आणि माझी एक मैत्रीण अशा दोघी तुम्हाला भेटण्यासाठी येत आहोत असे तिने डॉक्टरांना म्हटले. तिची सांकेतीक भाषा डॉक्टरांच्या लक्षात येण्यास वेळ लागला नाही. मी आता बाहेर आहे, दुपारी चार वाजता दवाखान्यात भेटेल असे डॉक्टरांनी तिला फोनवर सांगितले. डॉक्टरांचा सकारात्मक प्रतिसाद बघून त्या तरुणीची कळी खुलली. यावल तालुक्यातील मैत्रीणीला सोबत घेत तिने डॉक्टरचा दवाखाना ठरलेल्या वेळी गाठला. यावल तालुक्यातील त्या तरुणीचे अप्सरेसमान सौंदर्य बघून डॉक्टरचे होश उडाले. अस्सल मुर्तीमंत सौंदर्य बघून डॉक्टरची लाळ गळण्यास सुरुवात झाली. डॉक्टरांच्या मनात काय सुरु आहे हे दोघींनी हेरले होते. मी तुमच्या मनाप्रमाणे काम करुन तुम्हाला खुश करते असे यावल तालुक्यातील त्या तरुणीने डॉक्टरांना म्हटले. तिची चटोर देहबोली, लालचुटूक ओठ आणि मोठ्या गळ्याचा ड्रेस बघून डॉक्टरच्या काळजाचे पाणीपाणी झाले होते. त्या तरुणीला बघून डॉक्टरच्या मनात कामवासनेने घर निर्माण होते. यावल तालुक्यातील त्या तरुणीची देहबोली डॉक्टरच्या लक्षात आली होती. तुमची फी किती आहे असे डॉक्टरने तिला स्पष्टच विचारले. माझी फी पाच हजार रुपये आहे असे तिने डॉक्टरला सांगितले. आजुबाजुचा अंदाज आणि सावध पवित्रा घेत डॉक्टरने तिला सायंकाळी साडेसात वाजता बोलावले. सायंकाळी साडेसात वाजता आपले काम पक्के झाल्याची खात्री दोघा तरुणींना झाली होती. सायंकाळी साडेसात वाजता दवाखान्यात नगण्य स्टाफ होता. त्याचवेळी दोघी तरुणी डॉक्टरांसमोर हजर झाल्या. डॉक्टरने दोघा तरुणींना वरच्या मजल्यावरील स्पेशल रुममधे नेले. त्याठिकाणी यावल तालुक्यातील तरुणी डॉक्टरजवळच थांबली व जळगावची तरुणी बाहेर निघून आली. स्पेशल रुमचा दरवाजा आतून बंद झाल्यानंतर तरुणीने डॉक्टरला त्याच्या अंगावरील कपडे काढण्यास सांगितले. तरुणीचे रुप बघून डॉक्टरची जीभ आपसुकच त्याच्या ओठांवरुन फिरु लागली. काही वेळ डॉक्टर स्तब्ध उभा राहिला. दरम्यान तरुणीने तिचे स्वत:चे कपडे काढण्यास सुरुवात केली. काही वेळाने तिने डॉक्टरचे देखील कपडे काढण्यास सुरुवात केली. तिच्याच हातून डॉक्टर निर्वस्त्र झाला होता.

दरम्यान बाहेर बसलेल्या तिच्या मैत्रीणीचे चेतन राजेंद्र कासार आणि हिरामन एकनाथ जोशी हे साथीदार डॉक्टरला ब्लॅकमेल करण्यास जमले होते. दोघांचा कार्यक्रम ऐन रंगात आला असतांना बाहेर बसलेली तरुणी व तिचे साथीदार चेतन राजेंद्र कासार आणि हिरामन एकनाथ जोशी दार ढकलून आत आले. चेतन याने त्याच्या हातातील मोबाईलने दोघांची निर्वस्त्र अवस्थेतील शुटींग करण्यास सुरुवात केली. हिरामन याने डॉक्टरचा गळा दाबून त्याला चापटा बुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. हिरामन याने मारहाण करतच डॉक्टरला रिसेप्शन काऊंटरजवळ आणून बसवले. नियोजीत कार्यक्रमानुसार दोघी तरुणी तेथून गायब झाल्या. त्यांचा रोल त्यांनी बखुबी पुर्ण केला होता. आता ब्लॅकमेलींग अर्थात खंडणी मागण्याचा एपीसोड इतर साथीदारांच्या मदतीने सुरु झाला.

हिरामण जोशी याने एका महिलेला फोन लावून या डॉक्टरचे करायचे काय? असा प्रश्न विचारला. आपली आता खैर नाही हे डॉक्टरच्या लक्षात आले होते. तुम्ही काय करत आहात आणि कशासाठी करत आहात? असा विनवणीपुर्वक प्रश्न डॉक्टरने दोघांना विचारला. डॉक्टर बिथरल्याचे लक्षात आल्यानंतर चेतन कासार याने तुमच्या खिशात किती पैसे आहेत असा प्रश्न डॉक्टरला केला. तडजोडीची भाषा करण्यासाठी डॉक्टरसह दोघांनी डीएसपी चौक गाठले. त्याठिकाणी त्याठिकाणी बराच वेळ धमकावणीसह तडजोडीचा विषय अपुर्ण राहिला. त्यानंतर तिसऱ्या दिवशी १७ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेदहा वाजता प्रदिप कोळी नावाच्या तरुणाची या एपिसोडमधे एंट्री झाली. प्रदीप कोळी याने डॉक्टरला फोन करुन मला तुम्हाला भेटायचे आहे असे सांगून भेट घेतली. घडलेल्या घटनेबाबत प्रदीप कोळी याने तडजोडीची भाषा सुरु केली. तुम्हाला अडकवणारे लोक खुप डेंजर आहेत, त्यांची डिमांड मोठी आहे असे सांगून आधीच घाबरलेल्या डॉक्टरला प्रदीप कोळी याने अजून घाबरवण्याचे काम सुरु केले. पिंज-यात अडकून घाबरलेल्या वाघाप्रमाणे डॉक्टरची अवस्था झाली होती. ते लोक खुप डेंजर असून त्यांची डिमांड पुर्ण करा नाहीतर ते तुमचे जीवन खराब करुन टाकतील असा धाक दाखवण्याचे काम प्रदिप याने सुरु केले. त्यांची डिमांड मी तुम्हाला दुपारी विचारुन सांगतो असे म्हणत प्रदीपने डॉक्टरला घाबरलेल्या अवस्थेत ठेवून प्रस्थान केले. त्यानंतर सायंकाळी प्रदीप कोळी याने नुतन मराठा महाविद्यालयाजवळ डॉक्टरची भेट घेतली. यावेळी त्याच्यासोबत संदीप लोंढे नावाचा तरुण होता. ते सात लाख रुपयांची मागणी करत असल्याचा निरोप प्रदिप व संदीप या दोघांनी डॉक्टरला दिला. सात लाख रुपये दिले नाही तर ते तुमचा व्हिडीओ व्हायरल करणार आहेत. माझ्याकडे एवढे पैसे नाहीत असे डॉक्टरने काकुळतीला येत दोघांना सांगितले. त्यानंतर ठिक आहे दुसऱ्या दिवशी सकाळी बोलू असे म्हणत पुन्हा तडजोडीचा विषय लांबणीवर गेला. त्यानंतर १८ ऑक्टोबरचा दिवस उजाडला. दुपारी बारा वाजता प्रदीपचा डॉक्टरला फोन आला. आपल्या मॅटरचे काय झाले? असा प्रश्न पलीकडून प्रदीपने डॉक्टरला विचारला. ठरल्यानुसार सागर पार्क नजीक एका हॉटेलमधे डॉक्टर, प्रदीप आणि संदीप अशी तिघांची बैठक जमली. तुम्ही काय ते सांगा अशी सुचना वजा डाव प्रदीपने डॉक्टरकडे टाकला. माझ्याकडे फक्त दोन लाख रुपये असून मी तेवढेच देवू शकतो असे डॉक्टरने प्रस्ताव मांडला. त्यावेळी प्रदीपने चेतनला फोन लावून अपडेट कळवला. पुन्हा बोलणी फिस्कटल्याने सर्व जण तेथून निघून गेले. काही वेळाने प्रदीप याने डॉक्टरला सागर पार्क मैदानावर बोलावून चार लाख द्यावे लागतील असे सांगितले. चार लाख रुपयांचा आकडा ऐकून डॉक्टरने त्यांच्याकडे सायंकाळी फोन करतो असे म्हणत मुदत मागून घेतली. अशा प्रकारे अगोदर सात लाख मागणाऱ्या टोळीने चार लाख रुपये दोन टप्प्यात घेण्याची तयारी दर्शवली. या कालावधीत डॉक्टरने जळगाव शहर पोलिस स्टेशन गाठत पोलिस निरीक्षक विजयकुमार ठाकुरवाड यांची भेट घेत आपली व्यथा कथन केली. पो.नि. विजयकुमार ठाकुरवाड यांनी डॉक्टरची फिर्याद घेण्याची ठाणे अंमलदारास सुचना केली. डॉक्टरने दिलेल्या फिर्यादीनुसार तिघा महिलांसह चेतन राजेंद्र कासार, हिरामण एकनाथ जोशी, प्रदीप सुरेश कोळी व संदीप बबन लोंढे अशा एकुण सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. धमकावून बदनामी करण्यासह पैसे उकळण्याचा कट केल्याच्या आरोपाखाली सर्वाविरुद्ध गु.र.न. ३३४/२२ भा.द.वि. ३८९, ३२३, ५०६, १२० (ब), ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस उप निरीक्षक सर्जेराव क्षिरसागर व पोलिस उप निरीक्षक अरुण सोनार करत आहेत.

## वंशाच्या दिव्याने वाटोळे केले ...

व्हायची. यावरुन अनेकदा वाद टोकाला जायचे. व्यसनामुळे लग्नकार्यात अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे घरातील वातावरण खराब झालं होतं. या सगळ्या गोष्टींना वैतागून वडिलांनी मुलाच्या डोक्यात कुऱ्हाड घातली आणि हत्या केल.

पान ८ वरून...

## सचिन मंगनाळे यांना समाज सेवारत्न ...

मदत करून त्यांचे अश्रू पुसण्याचे काम केले आहे यांच्या कार्याची दखल घेऊन सचिन मंग नाळे यांना हा पुरस्कार देण्यात आला. या वेळी गजानन टिळे, गिरिधर गायकवाड, घुडूसाब महालंग्रे, डॉ. सूरशेट्टे मल्लिकार्जुन आदी मित्रमंडळी उपस्थित होते या पुरस्कारा बद्दल समाजातून अनेकांनी शुभेच्छाचा वर्षाव करण्यात आला.

## रांजणगाव येथे इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग...

ही संस्था पुण्यात आहे. या संस्थेच्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिक्स डिझाईनिंगचा एक प्रकल्पही महाराष्ट्रात होणार असल्याची माहिती श्री चंद्रशेखर यांनी पत्रकार परिषदेत दिली. या प्रकल्पाची किंमत साधारण १ हजार कोटी रूपये असणार असल्याचे श्री चंद्रशेखर यांनी सांगितले. पुढील काळात केंद्रीय माहिती तंत्रज्ञान विभागाच्यावतीने याचा प्रचार-प्रसार करण्यासाठी रोड शोचे आयोजन केले जाणार असल्याचेही चंद्रशेखर यांनी यावेळी सांगितले.

## न्यायमूर्ती महेश देवकते यांचा...

जी प्रेरणा मिळाली आहे त्यामधूनच मी न्यायाधीश पदापर्यत पोहोचू शकलो आहे. महाविद्यालयाने संस्काराची आणि शैक्षणिक परंपरेची उज्वल परंपरा जोपासावी आणि उत्तरोत्तर या महाविद्यालयाची प्रगती घडून यावी अशी त्यांनी आशा व्यक्त केली. यावेळी प्रा. रवींद्र सोनोने, डॉ.कैलास पाळणे, बादल बनसोडे आदीची उपस्थिती होती.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयामध्ये ...

उत्तम संधी प्रदान करते. यावेळी राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड यांनी सर्वांना देऊन राष्ट्रीय एकता दिनाचे महत्व सांगून भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांच्या कार्याची सर्वांना माहिती दिली.

क्राईम संध्या
सोमवार दि. ०७ नोव्हेंबर २०२२ ते रविवार दि. १३ नोव्हेंबर २०२२
लातूर/पालघर/सोलापूर
www.crimesandhya.com


# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त येणाऱ्या अनुयायांसाठी सर्व सोयी-सुविधा द्याव्यात - रामदास आठवले



**मुंबई/प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे लाखो अनुयायी अभिवादन करण्यासाठी येत असतात. यंदा ही संख्या मोठ्या प्रमाणात वाढू शकते, त्यामुळे प्रशासनाच्यावतीने सर्व सोयी-सुविधा देण्यासाठी काटेकोरपणे नियोजन करावे, असे निर्देश केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर रोजी चैत्यभूमी येथे शासनाच्या वतीने करावयाच्या सोयी - सुविधांबाबत सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री श्री. आठवले बोलत होते. बैठकीला मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, खासदार राहुल शेवाळे, आमदार सदा सरवणकर, माजी राज्यमंत्री अविनाश महातेकर,सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, अतिरिक्त पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) राजेंद्र सिंग, समाजकल्याण आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे, बार्टीचे महासंचालक धम्मज्योती गजभिये, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या महासंचालक जयश्री भोज, मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त आशिष शर्मा, पोलिस सहआयुक्त विश्वास नांगरे- पाटील, ज्ञानेश्वर चव्हाण, मुंबई उपनगरच्या जिल्हाधिकारी निधी चौधरी, आरोग्य संचालक डॉ.साधना तायडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे मार्गदर्शक भदंत डॉ. राहुल बोधी महाथेरो, सरचिटणीस नागसेन कांबळे, रवि गरूड, महेंद्र साळवे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री श्री. आठवले म्हणाले, चैत्यभूमी हे पवित्र ठिकाण आहे. चैत्यभूमीवर कोरोनानंतर मोठ्या प्रमाणात अनुयायी येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था चोख ठेवा. अनुयायांची कोणतीही गैरसोय होवू नये यासाठी रेल्वे, मुंबई महापालिका, गृह विभाग व सामाजिक न्याय विभाग तसेच सर्व संबंधित यंत्रणांनी योग्य पूर्वतयारी करावी. चैत्यभूमी येथील स्तूप मोठा करण्यासाठी मुंबई महापालिकेने लवकरात लवकर कार्यवाही करावी. तसेच या परिसराच्या सुशोभिकरणासाठी लोकप्रतिनिधींच्या सूचना व महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीच्या सूचना लक्षात घेवून काम करा. रेल्वेने येणाऱ्या अनुयायांसाठी रेल्वे प्रशासनानेही सहकार्य करावे. गर्दी टाळण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने खबरदारी घ्यावी. देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाली असून चैत्यभूमी परिसरात भारताचा राष्ट्रध्वज उभारावा. चैत्यभूमी परिसरात गर्दी टाळण्यासाठी या परिसरातील जास्त जागा प्रशासनाने या कालावधीत आपल्या अखत्यारित घ्यावी. याची अंमलबजावणी काटेकारपणे करावी, अशा सूचना यावेळी केंद्रीय राज्यमंत्री श्री. आठवले यांनी केल्या.

**चैत्यभूमी येथे सर्व सुविधा प्राधान्याने देणार : पालकमंत्री दीपक केसरकर**

पालकमंत्री दीपक केसरकर म्हणाले, चैत्यभूमीवर येणाऱ्या अनुयांयाना अभिवादन करताना कोणत्याही प्रकारची गैरसोय होवू नये याची खबरदारी घेण्यात येईल. महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीच्या सूचनांबाबत मुख्यमंत्री महोदयांना माहिती देवून निर्णय घेण्यात येतील. सध्या स्थानिक प्रशासनाचा उत्तम समन्वय आहे. अनुयायांसाठी वॉटर प्रूफ मंडपाची उभारणी, वैद्यकीय सुविधा तसेच इतर ठिकाणी होणाऱ्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येईल. येथे प्रशासन व नागरिकांनी हा कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहनही पालकमंत्री श्री.केसरकर यांनी यावेळी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे यांनी महापरिनर्वाण दिनानिमित्त प्रशासनाने करावयाच्या कामाबाबत विविध सूचना बैठकीत केल्या.प्रास्ताविक सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे यांनी केले. प्रत्येक प्रशासकीय विभागांनी यावेळी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे शासनाच्या वतीने करण्यात येणाऱ्या सेवा-सुविधांबाबत माहिती दिली.

## महात्मा बसवेश्वरच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहबंध मेळावा संपन्न




**लातूर/प्रतिनिधी**

दिवाळी सण उत्सवाचा, आनंदाचा, प्रकाशाचा, कुटुंबीयांसाठी तसाच आप्तेष्टांना भेटण्याचा दरवर्षी या सणाच्या निमित्ताने अनेक ठिकाणी मोठमोठे कार्यक्रम राबविले जातात. तर अलिकडे गेट-टुगेदरचे आयोजन देखील मोठ्या प्रमाणावर गावोगावी माजी विद्यार्थ्याकडून केले जात आहे. त्यापैकीच एक असलेले लातूरच्या श्री महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील १९९३-९४ बँचचे माजी विद्यार्थी २८ वर्षानी एकत्र जमले आणि वर्गमित्राची बसवेश्वर कॉलेज बॅच या नावाने व्हाट्सअप ग्रुप बनविला. या ग्रुपवरच स्नेह मेळावा घेण्याचे नियोजन आखण्यात आले. लातूरच्या मातोश्री वृद्धाश्रमात स्नेहबंध मेळावा आयोजित करण्यात आला. या गेट-टुगेदरच्या कार्यक्रमासाठी बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे सेवानिवृत्त माजी उपप्राचार्य भैय्यासाहेब नारंगे, प्रा. प्रल्हाद ढाके, पी. टी. पवार, डॉ. एम. एस. दडगे, प्रा. डॉ. श्रद्धा अवस्थी, आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी पीएच. डी. प्राप्त झालेल्या माजी विद्यार्थी प्रा. डॉ. महेश मोटे, डॉ. संजय शिंदे, डॉ. हनुमंत माने, डॉ. माच्छिंद्र खंडागळे, डॉ. दशरथ रसाळ यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व गुरुजनांचा माजी विद्यार्थ्याकडून यथोचित सत्कार करण्यात आला. गुरुजनांनी यावेळी मार्गदर्शन करून माजी विद्यार्थ्याप्रती मनोगतातून भावना व्यक्त केल्या. धनाजी तोडकर, हनुमान रांदड, अंगद पवळे, सतीश गायकवाड, कविता खणगे, अनिता यादव, दिनेश पाटील, माधव शिंदे, मच्छिंद्र खंडागळे आदींनी पुढाकार घेऊन हा सोहळा यशस्वी केला. लक्ष्मण बदिमे, शिवाजी कोराटे, नागेश सोनटक्के, बालाजी इतबारे, सुधीर कोरे, किरण भुसे, विवेकानंद थोरमोटे, उत्तरेश्वर चव्हाण, भीमाशंकर खोबरे, महादेव भालेराव, रमेश चव्हाण, दामोदर मुळे, धनंजय नांदगावकर, सतीश खांडके, तुकाराम तरगुडे, गुलाब काळे, राजकुमार केंचे, माधव पुंडकरे, यादव कसपटे, जलील शेख, अनिल कुलकर्णी, बालाजी बिरादार, रोहिणी स्वामी, सुजाता पोतदार, कमल पालीवाल, सुनिता सूर्यवंशी, अनुराधा स्वामी, सिंधू चौधरी, ज्योती वाळके, विजया पांचाळ, सीमा कुरेशी, मनीषा हरडगे आदींनी आपला स्वतःचा परिचय, जुन्या आठवणींना उजाळा देऊन भावस्पर्शी मनोगत व्यक्त करून निरोप घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक धनाजी तोडकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंगद पवळे आणि देवदत्त मुंढे तर आभार शिरीष पाटील यांनी मानले. यावेळी बहुसंख्येने माजी विद्यार्थी उपस्थित होते.

## दवणहिप्परगा येथे राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानांतर्गत प्रशिक्षण शिबिर




**देवणी/प्रतिनीधी**

राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान पंचायत समिती देवणी यांच्या वतीने आपला गाव आपला विकास (GPDP) उपक्रमाअंतर्गत ग्रामपंचायतींचा विकास आराखडा तयार करण्यासाठी दवणहिप्परगा येथील ग्रामपंचायत मध्ये पंचायत समिती गण दवणहिप्परगा अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतीचे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी गणातील सर्व गावाचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवकसह,आशा स्वयंसेविका, अंगणवाडी कर्मचारी व संबंधित सर्व विभागाचे कर्मचारी उपस्थित होते, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी टाकळी चे सरपंच अनंत पाटील तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून देवणी पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी कांबळे हे उपस्थित होते व प्रमुख पाहुणे म्हणून दवणहिप्परगा येथील सरपंच शशिकांत चिद्रे, रिपाई देवणी तालुका अध्यक्ष तथा ग्रा.पं.सदस्य गणेशभाऊ कांबळे दवणहिप्परगेकर, बोंबळी सरपंच मनीषा अंकुश गायकवाड, बोळेगाव सरपंच रंजना भरत म्हेत्रे, सह सर्व गावचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी पंचायत समितीचे कृषी अधिकारी बालाजी केदासे, विस्तार अधिकारी गोपनवाड, कृषी विस्तार अधिकारी धनाजी हैबतपुरे, आलापुरे यांनीही उपस्थितांना या बाबतीत सविस्तर माहिती दिली. सर्व उपस्थितांचे ग्रामविकास अधिकारी एच.एम. केंद्रे यांनी आभार मानले.

### जैन इरिगेशनच्या सहकाऱ्यांसाठी हृदय रोगाबाबत मार्गदर्शन कार्यक्रम

## हृदय विकाराचा झटका येण्या आधीच त्यावर प्रतिबंध आवश्यक -डॉ.रमेश कापडिया

**जळगाव/प्रतिनिधी**

भारतात अलीकडे विशीच्या युवकांमध्ये हृदय विकार दिसून येतो आहे. युवकांचा हृदय विकाराने मृत्यू हे देशासाठी शोचनीय आहे. ते टाळण्यासाठी हृदय विकारांवर प्राथमिक प्रतिबंध (अर्थात प्रायमरी प्रिव्हेंशन ऑफ हार्ट अटॅक) आवश्यक आहे असे मोलाचे मार्गदर्शन निष्णात हृदय रोग तज्ज्ञ डॉ. रमेश कापडिया यांनी केले. गांधी रिसर्च फौंडेशनच्या गांधी तीर्थ येथील कस्तुरबा सभागृहात कंपनीच्या सहकाऱ्यांसाठी डॉ. कापडीया यांचे मार्गदर्शनपर सुसंवाद काही दिवसांपूर्वी आयोजण्यात आला होता. त्यांचे स्वागत गांधी रिसर्च फाउंडेशनच्या सौ. अंबिका जैन यांनी केले. जैन इरिगेशनचे विपणन प्रमुख अभय जैन यांनी डॉ. कापडिया यांची ओळख करून दिली. हृदय विकार हा आजार नव्हे तर तुमच्या चुकीच्या जीवन पद्धतीचा तो परिणाम आहे.




जगातील तरुण मंडळी हृदय विकाराच्या झटक्याने मृत्यूमुखी पडतात ही दुर्दैवी बाब आहे. युवक त्या त्या देशाची अनमोल संपत्ती आहे युवाशक्तीचे हृदयविकाराने निधन होणे ही बाब देशासाठी, समाजासाठी खूप हानीकारक आहे असे कळकळीने सांगितले. युवकांना त्यातून वाचवण्यासाठी प्रत्येकानेच वयाच्या २१ वर्षानंतर आरोग्याच्या, हृदयाबाबतच्या काही तपासण्या अवश्य कराव्यात. व्यक्तीच्या कौटुंबिक हिस्टरीचा विचार अवश्य करावा. एलडीएल कोलेस्ट्रॉल ७० च्या खाली नियंत्रण ठेवायचा प्रयत्न करावा ह्या दोन महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या. आपल्या व्याख्यानात त्यांचे स्वतःचे अनुभव तर त्यांनी सांगितले पण त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीचे हृदय विकारांच्या झटक्याने निधन झाले एक डॉक्टर म्हणून त्यांनी काय केले त्याबाबत देखील मोलाचे सांगितले. वजन, नियंत्रण ठेवणे, योगा, व्यायाम, चालणे इत्यादी करून आरोग्य उत्तम ठेवावे असे मार्गदर्शन डॉ. कापडिया यांनी केले. त्यानंतर उपस्थित कंपनीच्या सहकाऱ्यांनी मोकळे पणाने प्रश्न विचारून आपल्या शंकांचे समाधान करुन घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गिरीश कुलकर्णी यांनी तर आभारप्रदर्शन के.बी. पाटील यांनी केले.



## वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अधिसुचितील प्रकरण ८मधील कलम (१) व १(२) अन्वये व ४६९ च्या नुसार जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय विरार येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय विरार येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोद घेतली जाईल.

| अ. क्र. | दिनांक | अनुसुचित दोन/तीन मधील नोटीसीचा मालमत्ता क्र. | करनिर्धार पुस्तकातील वॉर्ड क्र. | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप | जांचे नांवे मलमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्याचे नांव किंवा | खरिदाराचे किंवा अभिहस्तांकन कत्याचे नाव अभिहस्तांकन कत्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ०३/१०/२०२२ | VR03/183/6 | ०३ | मदिना मेंशन नदीना कंपाऊंड जिवदानी रोड हॉस्पिटलच्या पुढे | निवासी | सिराजबी बशिर सय्यद | रेहाना इब्राहिम दादन |
| २. | ०४/१०/२०२२ | VR20/6 | २० | ओम इशकृपा को.ओ.हौ.सो. | निवासी | रमेश गोपाळ कुंभार | रॉडनी रोमन पिंटो व विना रोमन पिंटो |
| ३. | ०६/१०/२०२२ | VR01/648/12 | ०१ | जिवदानी अपार्टमेंट ए २०४ रामु कंपाऊंड, चंदनसार रोड | निवासी | रुतुजा रविन्द्र गावडे व ममता रुपेश गुजर | ममता रुपेश गुजर |
| ४. | ०६/१०/२०२२ | VR01/449/20 | ०१ | अथर्व अपार्टमेंट रूम नं. २०१, केशवनगर, चंदनसार रोड | निवासी | संगीता संतोष उमळकर | जितेंद्र गणपत गुरव |
| ५. | ०७/१०/२०२२ | VR19/217/14 | १९ | ओम साईनगर | निवासी | दत्ताराम यशवंत पेणकर | मिलन रामचंद्र विचारे |
| ६. | ०७/१०/२०२२ | VR04/29/14 | ०४ | विकास स्मृती, फुलपाडा रोड, चौधरी वाडी/ विवा तारांगण जवळ | निवास | अश्विनी संजय गावकर | सरिता अनंत नवाळे व मिलिंद अनंत नवाळे |
| ७. | १०/१०/२०२२ | VR03/16/6 | ०३ | सागर कन्या को.ऑ.हौ. सो. पहिला मजला ए/७ | निवासी | विजय वामन कडू व विद्या कडू व मिथून विष्णू कडू | विजय वामन कडू व विद्या विजय कडू |
| ८. | १०/१०/२०२२ | VR01/37/7 | ०१ | द्वारका नगर चाळ, ३ रूम नं. ८ | निवासी | मनोहर जानु भोईर | राजेश वसंत मोरेकर |
| ९. | १०/१०/२०२२ | VR05/1669/66 | ०५ | साई यश संकुल तिसरा मजला रूम नं. ३१५, मथुरा डेअरी जवळ सहकार नगर | निवासी | रूमा सिंह | कल्पना सुनील गुप्ता |
| १०. | १०/१०/२०२२ | VR01/778/6 | ०१ | शबुबाई अपार्टमेंट रूम नं. २०२, रामु कंपाऊंड, वीर सावरकर मार्ग | निवासी | प्रकाश कृष्णा शेवाळे | प्रभात सुरेंद्र साहु व अनु प्रभात साहु |
| ११. | १०/१०/२०२२ | VR01/806/35 | ०१ | जिवदानी छाया अपार्टमेंट, साईनाथ नगर कॉटरडेकच्या मागे | निवासी | सोनाली प्रकाश निगाडे | प्रवीण प्रकाश पाटील |
| १२. | १०/१०/२०२२ | VR01/753/8 | ०१ | साई समर्थ नगर, चाळ नं. २, रूम नं. २ नारिंगी, विरार पुर्व | निवासी | सचिन महादेव खांबे | कुंदा महादेव खांबे |
| १३. | १०/१०/२०२२ | VR01/759/48 | ०१ | नागेश अपार्टमेंट, बी विंग गोपचर पाडा | निवासी | राजन दत्ताराम परब | शैलेश भगवानदास भोगले |
| १४. | १०/१०/२०२२ | VR05/1627/6 | ०५ | गांधी चौक फुलपाडा रोड | निवासी | जुगनू रामभगत बारोट | मंजू सत्येंद्र सिंह |
| १५. | १०/१०/२०२२ | VR22/124/16 | २२ | आकाश अपार्टमेंट रूम बी-३ | निवासी | गणपत रावजी धामणे | सुजाता गणपत धामणे |
| १६. | १०/१०/२०२२ | VR03/16/7 | ०३ | सागर कन्या को.ऑ.हौ.सो. पहिला मजला ए/८ | निवासी | जयवंती विश्वास मेहेर | तुषार विश्वास मेहेर |
| १७. | १०/१०/२०२२ | VR02/94 | ०२ | साईदत्त झोपडपट्टी | निवासी | संजीवकुमार गुप्ता | सरवण रामसुरत यादव |
| १८. | १०/१०/२०२२ | VR01/684/3 | ०१ | श्री गणेश अपार्टमेंट, रूम नं. ३ बाप्पा सिताराम नगर, नारिंगी रोड | निवासी | किरण रामनयन यादव | संगीता उमाशंकर गुप्ता |
| १९. | १०/१०/२०२२ | VR30/50/8 | ३० | साई सावली पहिला माळा, रूम नं. ०९ | निवासी | जसवंत अ सिंह | ज्ञानेश लक्ष्मण गावडे व पूजा ज्ञानेश गावडे |
| २०. | १०/१०/२०२२ | VR05/1656/46 | ०५ | साई मिलन अपार्टमेंट फुलपाडा डॅम जवळ, फुलपाडा रोड पुर्व | निवासी | अभिमन्यु सहगन गुप्ता | रामानंन्द रामसागर शर्मा |

जावक क्र. : वविशम/प्रससी/जाहिरात/१५१/२०२२-२३
दिनांक : २८/१०/२०२२

सही/-
(पद्माकर गावले)
अधिक्षक
प्रभाग समिती 'सी' चंदनसार
वसई-विरार शहर महानगरपालिका

# कोल्हापूर येथे सचिन मंगनाळे यांना समाज सेवारत्न पुरस्कार प्रदान




**देवणी/प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिबा फुले शिक्षक परिषद महाराष्ट्र राज्याच्या वतीने दिला जाणारा व अत्यंत प्रतिष्ठेचा समाज सेवारत्न पुरस्कार लोकअस्मिता चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव सचिन मंगनाळे यांना १२वी राज्य शिक्षक परिषद व पुरस्कार वितरण सोहळा सहकार महर्षी शामराव पाटील यद्रावरकर नाट्यगृह जयशिंगपूर येथे माजी खासदार राजू शेट्टी, ब्रिगेडियर माजी खासदार सुधीर सावंत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा जोतिबा फुले शिक्षक परिषदेचे प्रदेशाध्यक्ष व्यंकटराव जाधव, प्रदेश सचिव गोपीनाथराव सगर सर, आमदार राजेंद्र पाटील इत्यादी मान्यवर उपस्थित होते. हा पुरस्कार सहपत्निक कुटुंबासमवेत विविध सामाजिक शैक्षणिक, राजकिय वैद्यकीय कृषि क्षेत्रात नाविन्यपूर्ण काम करणाऱ्या कर्तबगार लोकांना हा पुरस्कार दिला जातो सचिन मंगनाळे यांनी आपल्या लोकअस्मिता चॅरिटेबल ट्रस्ट च्या माध्यमातून सामाजिक शैक्षणिक राजकिय वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय काम वृक्ष लागवड, व्यसनमुक्ती, विद्यार्थी पालक यांचा गौरव सोहळा, महिलांना साडी चोळी वाटप,महापुरुषांच्या जयंती साजरी करणे, त्या माध्यमातून महापुरुषाच्या विचाराचा वारसा व्याख्यान च्या माध्यमातून जनजागृती करणे, शैक्षणिक साहित्य वाटप करणे, भजन, भारुड, कीर्तन कार्यक्रम आयोजित करून समाज प्रबोधन करणे,समाज प्रबोधन करणाऱ्याना साहित्य पुस्तकी साहित्य पुरवठा करणे, कला, साहित्य विकास करण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजन करणे, रक्तदान शिबिर, नेत्र निदान शिबिर, आरोग्य शिबिर आदी काम केल्यामुळे मंगनाळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला सचिन मंगनाळे यांनी सामाजिक बांधिलकीतुन सर्व क्षेत्रात अडचणीत असलेल्या सर्व सामन्याल ...पान ६ वर

# पर्यावरण आणि स्थानिकांच्या आकांक्षा लक्षात घेऊन विकासाचा समतोल साधला जाईल - मुख्यमंत्री शिंदे

**पालघर/प्रतिनिधी**

किनारपट्टी क्षेत्र विकास आराखड्यास मान्यता दिली असून पर्यावरण व स्थानिकाच्या आकांक्षा लक्षात घेऊन विकासाचा समतोल साधला जाईल असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले. सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाच्या नूतन वास्तूचा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून संपन्न झाला लोकार्पण सोहळ्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. देशाच्या आर्थिक राजधानी पासून जवळ असलेल्या पालघर जिल्ह्यामध्ये उद्योग, विविध प्रकल्प यावेत यासाठी शासन प्रयत्नशील असून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. जिल्ह्याची नूतन प्रशासकीय इमारत देशामध्ये सुसज्ज इमारत मानली जाते. या इमारतीमध्ये येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्याचे काम जिल्हा प्रशासन करत आहे. औद्योगिक दृष्ट्या




जिल्ह्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. येत्या काळात अनेक सुविधा या जिल्ह्याला उपलब्ध होणार आहेत आदिवासी बांधव बहुसंख्येने या जिल्ह्यात वास्तव्यास असल्याने आदिवासी बांधवांचा जिल्हा म्हणूनही या जिल्ह्याला ओळखले जाते. आदिवासी बांधवांच्या हाताला काम देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले. यावेळी पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण (दूरदृष्य प्रणाली द्वारे), खासदार राजेंद्र गावित, आमदार श्रीनिवास वनगा, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती चंद्रकांत भडंग (दूरदृष्य प्रणाली द्वारे) राज्याचे धर्मादाय आयुक्त महेंद्र महाजन, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, सहायक धर्मादाय आयुक्त दिनकर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# दक्षता जनजागृती सप्ताहाच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमाचे आयोजन



**पालघर/प्रतिनिधी**

भ्रष्टाचारा विरुद्ध नागरिकामध्ये जनजागृती करण्यासाठी अँन्टी करप्शन ब्युरो यांनी जिल्ह्यात विविध कार्यक्रम आयोजित केले. वाडा येथील निरनिराळ्या शासकीय कार्यालयाच्या दर्शनी भागावर एसीबी चे स्टिकर लावण्यात आले. तसेच बसस्थानक परिसरात लोकांना एसीबी ची पत्रके वाटून जनजागृती केली. कॉर्नर मिटींग घेऊन भ्रष्टाचाराविरुध्द जनजागृती करण्यात आली. विक्रमगड येथे सप्ताहाचे अनुषंगाने रिक्षाचालक, ग्रामस्थ यांची कॉर्नर मीटिंग घेण्यात आली. संबंधितांना एसीबी ची कार्यपद्धती समजाऊन सांगून जनजागृती करण्यात आली. मनोर परिसरात सप्ताहाचे अनुषंगाने पोस्टर्स लावण्यात आले. कोणी लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्यास एसीबी कार्यालयात तक्रार देण्याबाबत उपस्थितांना आवाहन करण्यात आले. पालघर जिल्ह्यातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजेंट) कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ आमचेशी संपर्क साधावा. अँन्टी करप्शन ब्युरो,ठाणे, कॅम्प पालघर, दुरध्वनी ०२५२५-२९७२९७, पोलिस उप अधीक्षक नवनाथ जगताप, मोबा ९९२३३४६८१०/ ९८५०१५८८१०, पोलीस निरीक्षक स्वपन बिश्वास मोबा ८००७२९०९४४/ ९४०५७२२०११, टोल फ्रि क्रं. १०६४.

# जेऊरची श्री स्वयंभू काशीविश्वेश्वर यात्रा उत्साहात साजरी

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील जेऊर येथील दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री स्वयंभू काशीविश्वेश्वर महारथोत्सव कार्यक्रम शनिवारी पांडव पंचमीच्या दिवशी सालाबादप्रमाणे मोठ्या भक्ती भावाने उत्साहात साजरी करण्यात आला. शनिवारी पहाटे श्रींचे अभिषेक करण्यात आला. दुपारी भजनांचा कार्यक्रमानंतर रात्री ८ वाजून ३० मिनिटांनी महारथोत्सवाच्या मिरवणुकीस प्रारंभ झाला. महारथोत्सवास पुष्पहारानी सजवून लिंबूचे हार, ऊस व विद्युत रोषणाईने सजवण्यात आले होते. सायंकाळी नंदीकोल काट्यांची मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर मानाचे गावचे पाटील यांच्याकडून महारथोत्सवास कुंभ अर्पण केल्यानंतर रात्री साडे आठ वाजण्याच्या सुमारास मिरवणुकीस सुरुवात झाली. यावेळेस दिवसभर हजारो भाविकांनी श्री स्वयंभू काशीविश्वेश्वराचे दर्शन घेऊन महारथोत्सव कार्यक्रमात सहभाग नोंदविला. महारथोत्सवसमोर देवांच्या काट्या लहान मोठ्या घोड्यांचा खेळ, भजन, अंबारीवर राजा राणीचे दृश्य, अस्वलांचा खेळ, मानाच्या दिवट्या व वीरभद्र पुरंत असे हजारो भक्तगणांच्या साक्षीने श्री स्वयंभू काशीविश्वेश्वर मंदिरापासून मुख्य रस्त्यावरून गावच्या




वेशीपर्यंत मिरवणूक मोठ्या उत्साहात पार पडले. त्यानंतर शोभेची दारूची आतषबाजी करण्यात आली. रात्री गोंधळी कार्यक्रम व कन्नड नाटक ही झाली. श्री काशिलिंग देवस्थान कमिटीच्यावतीने दिवसभर महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम चालू होता. श्री काशीविश्वेश्वर यात्रेनिमित्त बसवेश्वर तरुण मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले. या महारथोत्सव सोहळ्यात दरवर्षी जेऊर ग्रामपंचायतीचे कर्मचारी व महावितरणचे कर्मचाऱ्यांचे महत्त्वाची जबाबदारी पार पाडतात. यावेळी श्री स्वयंभू काशीविश्वेश्वर यात्रा कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, माजी सरपंच महांतेश पाटील, काशिनाथ पाटील, सुभाष पाटील, माजी सरपंच शिवाजी कलमदाणे, नागनाथ सुरवसे, बंडप्पा पाटील, शिवराज बोरीकरजगी, चंद्रकांत कळवंत, बसवराज वगे, काशिनाथ कडगंची, इरण्णा कणमुसे, संगमेश कलशेट्टी, राजशेखर मुस्के व कमिटीचे सदस्य व ग्रामस्थांचेही मोलाचे सहकार्य लाभले. हा महारथोत्सव सोहळा शांततेत पार पाडण्यासाठी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, अक्कलकोट उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर यांच्या मार्गदर्शनाखाली अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदीप काळे यांच्या नेतृत्वाखाली बीटचे हवालदार, पोलीस नाईक व पोलीस कर्मचाऱ्यांनी चोक बंदोबस्त ठेवला होता.

# रांजणगाव येथे इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर उभारणार -राजीव चंद्रशेखर




नवी दिल्ली : पुण्याजवळील रांजणगाव येथे इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर (ईएमसी) उभारले जाईल अशी घोषणा केंद्रीय इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी पत्रकार परिषदेत केली. येथील सीजीओ कॉम्प्लेक्समधील सीइजी सभागृहामध्ये आयोजित पत्रकार परिषदेत श्री चंद्रशेखर यांनी रांजणगाव येथे इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर उभारले जाईल तसेच सीडॅकच्यावतीने इलेक्ट्रॉनिक्स डिझाईनिंग प्रकल्पही महाराष्ट्रात येणार असल्याची घोषणा केली. रांजणगाव (फेस III) येथील होऊ घातलेल्या इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर (ईएमसी) मुळे येत्या काळात जवळपास ५ हजार रोजगार उपलब्ध होणार असल्याचे श्री चंद्रशेखर म्हणाले. या प्रकल्पासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष पाठपुरावा केला असल्याचे श्री चंद्रशेखर यांनी यावेळी सांगितले. ईएमसीच्या प्रकल्प विकासासाठी एकूण ४९२.८५ कोटी रूपये अंदाजित खर्च येणार असून २०७.९८ कोटी रूपयें केंद्र सरकार तर २८४.८७ कोटी रूपये महाराष्ट्र शासनच्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाव्दारे गुंतविले जातील. या प्रकल्पाच्या माध्यमातून सुमारे २ हजार कोटी रूपयांची गुंतवणूक भविष्यात आकर्षित केली जाणार असल्याचेही श्री चंद्रशेखर यांनी सांगितले. या प्रकल्पांतर्गत अँकर क्लायंट मेसर्स आयएफबी रेफ्रिजरेशन मर्यादितने या ठिकाणी ४० हजार एकर जमीन घेतली असून या कंपनीने सुमारे ४५० कोटी रूपयांची गुंतवणूक केलेली आहे. यासह २९७.११ एकर जमीनीपैकी २०० एकर जमीन विविध इलेक्ट्रॉनिक औद्योगिक समुहांना वाटप केली जाईल, याठिकाणी इलेक्ट्रॉनिक उत्पादन आणि त्याच्याशी निगडीत साखळी विकसित केली जाईल. पुढील ३२ महिन्यांमध्ये येथील पायाभूत सुविधा पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाला सुरूवात होईल, अशी अपेक्षा श्री चंद्रशेखर यांनी यावेळी व्यक्त केली. तामिळनाडू, कर्नाटक राज्यांत तसेच नोएडा, तिरूपती या चार ठिकाणी ईएमसी प्रकल्प आहेत. आता महाराष्ट्रातही असा प्रकल्प उभारण्यात येणार असल्याने आता रांजणगाव हा परिसर इलेक्ट्रॉनिक हब म्हणून ओळखले जाईल, असा आशावाद चंद्रशेखर यांनी व्यक्त केला.

**सी-डॅकच्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिक्स डिझाईनिंग प्रकल्प महाराष्ट्रात उभारणार**

सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ अँडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग, इंडिया (सी डॅक) ...पान ६ वर

# पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे संदर्भात केंद्रीय रेल्वे मंत्र्यांकडे पाठपुरावा करणार-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई/प्रतिनिधी**

महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनने (महारेल) पुणे- नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे संदर्भात केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी केलेल्या सूचनांचा विचार करुन त्याच्या पूर्ततेसाठी आवश्यक कार्यवाही करावी. त्यानंतर त्वरित महारेलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत केंद्रीय रेल्वेमंत्र्यांसमोर या प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात येईल आणि प्रकल्प मंजुरीसाठी पाठपुरावा करण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. मंत्रालयात आज उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी महारेलच्या विविध प्रकल्पांसंदर्भात आढावा बैठक घेतली, त्यावेळी ते बोलत होते. अपर मुख्य सचिव आशीषकुमार सिंह, वित्त विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता, वॉररुमचे महासंचालक राधेश्याम मोपलवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एस.डी. सोळंके, महारेलचे व्यवस्थापकीय संचालक राजेशकुमार जयस्वाल, मुख्य सल्लागार एम.एम. गढवाल, अशोक गरुड, पी. के. श्रीवास्तव, कार्यकारी संचालक (वित्त) सुभाष कवडे आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, पुणे - नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे संदर्भात प्रकल्पाची उपयुक्तता पटवून देण्यासाठी येत्या काही दिवसात पुन्हा रेल्वेमंत्र्यांची भेट घेणार आहोत. त्यांना या प्रकल्पाची व्यवहार्यता पटवून दिली जाईल. पुणे - नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प पूर्ण करताना या मार्गावर सुरक्षिततेत्या दृष्टीने सर्व ती काळजी घेतली गेली आहे. यासंदर्भात केंद्रीय रेल्वेमंत्रालयाचे काहीही आक्षेप असतील तर त्याचे निराकरण करुन हा प्रकल्प मंजूर होईल, यासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय, उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी नागपूर (इटवारी) - नागभीड प्रकल्पाच्या कामांसंदर्भातही माहिती घेतली. या मार्गाचे काम प्रगतीपथावर असून इटवारी येथील रेल्वे स्टेशनचे काम पूर्ण झाल्याची माहिती महारेलच्या अधिकाऱ्यांनी दिली. या मार्गावर ठिकठिकाणी वृक्षारोपण करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी महारेलच्या अधिकाऱ्यांनी पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प, नागपूर (इटवारी)-नागभीड मार्ग आणि राज्यातील विविध ठिकाणच्या रेल्वेमार्गावरील उड्डाणपुलांच्या कामांच्या सद्यस्थितीबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

# देवणी तालुक्यातील उर्वरित १६ रास्त भाव दुकानात आनंदाचा शिधा पोहचला



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील १६ रास्त भाव दुकानात आनंदाचा शिधा जिल्हा पुरवठा विभागाच्या वाहतूक यंत्रणेच्या अडचणीमुळे पोहचायला उशीर झाला मात्र रविवार दि.३० ऑक्टोबर रोजी सायंकाळी तालुक्यातील उर्वरित त्या १६ दुकानाचा आंनदाचा शिधा पोहचला आहे. अशी माहिती रास्त भाव दुकानदार संघटनेचे तालुकाध्यक्ष नितीन देशमुख यांनी बोलताना दिली. पुढे बोलताना देशमुख म्हणाले की, वलांडीसह आदी गावात दिवाळीत आनंदाचा शिधा किट मधील चना दाळ आणि साखर पोहोचले होते मात्र तेल आणि रवा पोहचले नसल्याने दुकानदारांसमोर वाटपात अडचणी निर्माण झाल्या होत्या. लाभार्थी संपूर्ण किटची मागणी केली मात्र पुर्ण किट उपलब्ध होऊ न शकल्यामुळे लाभार्थ्यातून संतप्त व्यक्त करण्यात आले होते. मात्र आता आनंदाचा शिधा उर्वरित १६ दुकानात पोहचला आहे. ते रास्त भाव दुकानातून शंभर टक्के दिवाळीत आंनदाचा शिधा वाटप करण्यात आला आहे. अशी माहिती देवणी तालुका रास्त भाव दुकानदार संघटनेचे तालुकाध्यक्ष नितीन देशमुख यांनी बोलताना दिली.

# न्यायमूर्ती महेश देवकते यांचा सत्कार




**लातूर/प्रतिनिधी**

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे २००३-२००४ या शैक्षणिक वर्षाचे माजी विद्यार्थी मा.महेश रामचंद्र देवकते यांचा प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, माजी प्राचार्य उमाकांत बिरादार, डॉ.श्रद्धा मिसर, अँड.महेश शिंदे, श्री नागोराव गोरे, प्रा भरत वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. न्यायमूर्ती देवकते यांची २००९ मध्ये न्यायीक सेवेत निवड झाली असुन सध्या ते मालवण जिल्हा सिंधुदुर्ग येथे न्यायाधीश पदावर कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी न्यायाधीश म्हणून बीड, यवतमाळ, सोलापुर येथे सेवा केली आहे. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय हे विद्यार्थ्यांची माणुसकीच्या जाणिवेतून जडणघडण करणारे आहे. या महाविद्यालयात माझ्यावर जे संस्कार झाले आहेत, ...पान ६ वर

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयामध्ये स्वर्गीय सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांना विनम्र अभिवादन!



**लातूर/प्रतिनिधी**

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूरद्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथे राष्ट्रीय सेवा योजना आणि महाविद्यालय जयंती उत्सव समिती व्दारा सरदार वल्लभभाई पटेल आणि भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांना प्रभारी प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार घालून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य बालाजी जाधव, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ.शिवप्रसाद डोंगरे, डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, प्रा.आशिष क्षीरसागर, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, विनायक लोमटे, योगिराज माकणे, महादेव स्वामी, पाटील, कृष्णा बडगिरे, नरेश वाडकर, संदीप मोरे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. दरवर्षी ३१ ऑक्टोबर हा दिवस सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती संपूर्ण देशात राष्ट्रीय एकता दिवस म्हणून मोठ्या उत्साहात साजरा साजरी केली जाते. हा दिवस आम्हाला राष्ट्राची सुरक्षा, एकता, अखंडता बळकट करण्याच्या वचनबद्धतेला एक ...पान ६ वर